स.नं.२५११
पुणें मराठी ग्रंथालय
निबंध
क्रमांक—

…ची लघुपुस्तकमाला नं. २.

# … आणि तिचे टीकाकार.

( काहीं आक्षेपांचें निरसन. )

लेखक

**वासुदेव लक्ष्मण चिपळूणकर,**

वकील, अकोला.

पुणें येथें
'आर्यभूषण' छापखान्यांत **नटेश अप्पाजी द्रविड** यांनीं छापिलें
व
**वासुदेव लक्ष्मण चिपळूणकर** यांनीं
**मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन**
करितां प्रसिद्ध केलें.

एप्रिल १९१४.

किंमत १ आणा.

# " थिऑसॉफिकल-सोसायटी. "

## [ जिज्ञासूंकरितां माहिती ]

" अमेरिकेंत, न्यूयॉर्क शहरीं, ता. १७ नवंबर १८७५ इसवी रोजीं थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना झाली; व ता. ४ एप्रिल १९०५ या दिवशीं मद्रास ( अड्यार ) येथें कायदेशीर रीतीनें नोंदून तिला विशिष्ट स्वरूप देण्यांत आलें. कोणत्याही प्रकारच्या भेदभावास स्थल न देतां, स्वतंत्र रीतीनें सत्यसंशोधन करणाऱ्या व्यक्तींची ही संस्था असून, अखिल मानवजातीची आध्यात्मिकदृष्ट्या उन्नति करण्याचा तिचा यत्न आहे व म्हणूनच नास्तिक्यास आळा घालून सर्वत्र धर्मजागृति करणें हें या संस्थेचें आद्य कर्तव्य आहे.

या सोसायटीचे मुख्य तीन उद्देश येणेंप्रमाणें:—

( १ ) जात, धर्म, लिंग, वर्ण, रंग इत्यादि कृत्रिम व अकृत्रिम भेद बाजूस ठेवून मानवजातीच्या बंधुत्वाचा केंद्र बनविणें.

( २ ) धर्म, तत्वज्ञान व भौतिक शास्त्रें यांच्या तुलनात्मक अभ्यासास उत्तेजन देणें.

( ३ ) अज्ञात सृष्टिनियम व मनुष्याचे अंगीं असलेल्या गुप्तशक्ति यांचें संशोधन करणें.

थिऑसफिकल सोसायटी ही एक विद्यार्थ्यांचा संघ आहे. त्यांत प्रवेश करूं इच्छिणारा विद्यार्थी कोणत्याही धर्माचा अनुयायी असो, अथवा त्यास कोणताही धर्म नसो. त्यामुळें त्यास या सोसायटींत मज्जाव होऊं शकत नाहीं. या सर्वांस सामान्य बंधन म्हणजे उपरिनिर्दिष्ट उद्देशासंबंधानें मान्यता हें होय. तसेंच, धार्मिक कलह नाहींसे करण्याची त्यांची इच्छा, धर्मपंथादि भेद मनांत न आणतां सर्व सदिच्छाप्रेरित लोकांमध्यें ऐक्यभाव उत्पन्न करण्याची वासना, धार्मिक सिद्धांतांच्या अध्ययनाची मनीषा व तत्संबंधीं प्राप्त झालेल्या ज्ञानाची इतर लोकांशीं प्रेमपूर्वक देवघेव इत्यादि गोष्टीही या विद्यार्थ्यांच्या लक्षणांपैकींच होत. ' विशिष्ट सिद्धांतांस अथवा मतांस प्रमाणभूत मानणें ' हें या विद्यार्थ्यांचें बंधन नसून, ' सत्यसंशोधन व त्याचा स्वीकार ' यांनीं ते या संघांत बांधले जातात. अध्ययन, मनन, शुद्ध आचरण, सद्गुणांवर दृढ भक्ति इत्यादि मार्गांनींच सनातन सत्य सांपडतें असें यांचें मत आहे. प्रयत्नांची पराकाष्ठा करून ज्ञानपूर्वक सत्यप्राप्ति झाली पाहिजे, केवळ अधिकाराच्या जोरावर सत्यसुद्धां कोणाच्या माथीं जबरदस्तीनें मारतां कामा नये, अशी यांची समजूत आहे. अभ्यासादि मार्गांनीं अथवा अंतःस्फूर्तीनें ज्ञान पटलें असतां त्याचा स्वाहजिक परिणाम श्रद्धा हा होतो. ज्ञान पटण्यापूर्वी अशी श्रद्धा असण्याची आवश्यकता नाहीं ही गोष्ट त्यांस पसंत आहे श्रद्धा ज्ञानानें स्थापित झाली पाहिजे, श्रद्धा असावी म्हणतात म्हणून ठेवावी अशा प्रकारची ती अंध असतां कामा नये, असें त्यांस वाटतें. सर्व प्रकारच्या मताभिमान्यांशीं—त्यांमध्यें कोणी दुरभिमानी असला तरी त्याशीं—पूर्ण औदार्यानें वागणें ते योग्य समजतात. असें समजण्यांत अन्य मताभिमान्यांवर ते कांहीं मेहेरबानी करतात असें नव्हे, तर तसें करणें हें आपलें कर्तव्यच होय असें ते लेखतात. कारण, अज्ञान नाहींसें करण्याचा जरी ते प्रयत्न करतात, तरी अज्ञान्यांस शासन व्हावें अशी त्यांची इच्छा नसते. प्रत्येक धर्मपंथ हा ईश्वरी ज्ञानाचें—सनातन सत्याचें, ब्रह्मविद्येचें—एक समर्याद व विशिष्ट स्वरूप आहे असें ते ओळखतात; आणि म्हणूनच, प्रत्येक धर्मांतील दोष काढीत बसून त्यास नांवें ठेवण्याचेऐवजीं त्या सर्व धर्मांचा उदार मनानें अभ्यास करणेंच ते जास्त पसंत करतात. व याच कारणानें धर्मांतरापेक्षां धर्माचरणास ते जास्त मान देतात. ' शांतता ' हा त्यांचा परवल असून, ' सत्य ' हेंच त्यांचें ध्येय आहे.

# उपोद्घात.

या लेखमालेंतील पहिले सात लेख पुण्याचे ‘ **मुमुक्षु** ’ पत्रांत प्रसिद्ध झाले आहेत व आठवा लेख **केसरीचे** ता. १५ ऑगस्ट १९११ च्या अंकांत प्रसिद्ध झालेला आहे. गेल्या दोन वर्षांत थिऑसॉफिकल सोसायटीचे इतिहासांत घडून आलेल्या गोष्टींमुळें त्या सोसायटीचे पुढाऱ्यांचे नव्या व जुन्या जीवनचरित्रांतील कांहीं गोष्टींबद्दल व मतांबद्दल प्रतिकूल असे लेख महाराष्ट्रांत अनेक पत्रांतून आले. एका ठिकाणीं तर स्वतंत्र लहानसें चोपडेंही प्रसिद्ध करण्यांत आलें तेव्हां थिऑसफांचे अनुयायांचें ह्मणणें काय आहे तेंही लोकांपुढें येणें जरूर व इष्ट आहे.

या लेखांत ज्यांस मीं उत्तर दिलें आहे त्यांपैकीं कांहीं आक्षेप कायमचेच झाले आहेत. सोसायटींत कांहीं गडबड झाली कीं, टीकाकार तेच तेच आक्षेप घेऊन उभे व कांहीं कायमचे होण्याचा सुमार दिसत आहे. अशा स्थितींत त्यांचें उत्तरहीं कायमच्या स्वरूपानें शांत व निरपेक्ष व जिज्ञासु वाचकांकरितां उपलब्ध असावें म्हणून ही लेखमाला एकत्र छापिली आहे. अन्यवृत्तीच्या माणसांची खात्री कालावधीनें पटेल तेव्हां पटेल. या लेखमालेंत बऱ्याच ठिकाणीं नवीन अवतरणें व बहुतेक आंग्ल उताऱ्यांचीं भाषांतरें पूर्वी ‘ **मुमुक्षू** ’ च्या स्थलसंकोचास्तव देतां आलीं नाहींत तीं दिलीं आहेत.

वा. ल. चि.

# विषयानुक्रमणिका.


| | पान. |
|---|---|
| १ लेखांक १ ला. ( बेझंटबाई व ब्लॅव्हॅट्स्कीबाईंचा चरित्रक्रम. ) | १–७ |
| २ लेखांक २ रा. ( बेझंटबाईंचीं मतांतरें ) ... ... .. | ७–१३ |
| ३ लेखांक ३ रा. ( महात्मे व त्यांचे संदेश ) ... ... ... | १३–२३ |
| ४ लेखांक ४ था. ( महात्म्यांचें हिंदी गृहस्थांस दर्शन व संदेश ) | २४–२७ |
| ५ लेखांक ५ वा. ( बेझंटबाई व लेडबीटर ) अ. ... ... | २८–३२ |
| ६ लेखांक ६ वा. ( „ „ „ ) ब. ... ... | ३२–४१ |
| ७ लेखांक ७ वा. ( मतभेद बिलकुल सहन होत नाहीं ) ... | ४१–४७ |
| ८ लेखांक ८ वा. ( दोन कृष्ण व दोन शंकराचार्य ) ... ... | ४७–५२ |


---

**शुद्धि**—पान २४ वर ‘ लेखांक ५ ’ चे बद्दल ‘लेखांक ४’ असें वाचावें.

---

# थिऑसफी व तिचे टीकाकार.

## लेखांक १ ला.*

मि. जी. नारायणय्या यांनीं आपले दोन मुलगे कृष्णमूर्ति व नित्यानंद यांना आपल्या ताब्यांत मिळण्याबद्दल थिऑसफिकल सोसायटीच्या अध्यक्ष मिसेस बेझंट यांजवर मद्रास हायकोर्टांत फिर्याद लाविल्यापासून व विशेषेंकरून तिचा निकाल बेझंटबाईंचे विरुद्ध झाल्यापासून थिऑसफी, थिऑसफिकल सोसायटी, तिचे पुढारी वगैरे विषयांबद्दल सर्व हिंदुस्थानभर इंग्रजी व प्राकृत वर्तमानपत्रांतून जोरानें प्रतिकूल टीका लेखनद्वारां व व्याख्यानद्वारां सुरू झाली आहे. त्याचप्रमाणें ती महाराष्ट्रांतही चालू आहे. या टीकेंत रा. श्री. दा. सातवळेकर रा. सा. गोविंदराव कानिटकार, रा. म. गो. अभ्यंकर, रा. शि. म. परांजपे (माजी काळकर्ते), रा. त्र्यं. गु. काळे, रा. ह. र. भागवत, मुमुक्षुकर्ते रा. पांगारकर वगैरे गृहस्थ पुढाकार घेणारे आहेत. मित्रवर्य रा. त्र्यं. गु. काळे यांनीं तर 'थिऑसफी व बेझंटबाई' या मथळ्याखालीं 'मुमुक्षु' पत्रांत एक प्रतिकूल लेखमालाच छापून प्रसिद्ध केली. रा. काळे यांच्याशीं ओळख करून देण्याचा व संभाषणाचा सुयोग पुण्यांतील एका सद्गृहस्थांनीं गेल्या उन्हाळ्याचे सुट्टींत जुळवून आणला व त्या थोडक्या अवधींत रा. काळे यांच्याशीं त्यांचे लेखांतील दोन मुद्यांचा माझ्या अल्पमतीस जसा वाटला तसा मीं खुलासा केला व आनंदाची गोष्ट ही कीं, एका मुद्यासंबंधीं रा. काळे यांनीं आपल्या हातून घडलेली नजरचूक मोठ्या तत्परतेनें व सरळपणानें कबूल केली व ती 'मुमुक्षु'चे

---

*टीप:—या व पुढील लेखांमध्यें आधार म्हणून बाईंच्या आत्मचरित्रांतील उतारे घेतले आहेत. बाईंचें चरित्र पुष्कळांशीं सर्वविश्रुत आहे. कांहींकांच्या तर आठवणींतलें आहे. त्यांचे आत्मचरित्रांतील हकीकत व इतरांनीं त्यांचे आयुष्यक्रमांतील घडलेल्या गोष्टींविषयींची लिहिलेली हकीकत यांत केव्हांही विरोध झालेला नाहीं. तेव्हां हे उतारे पूर्ण विश्वासनीय आहेत.

ता. १९ जूनच्या अंकांत प्रसिद्ध केली व दुसऱ्या मुद्यासंबंधीं ' चौकशी व विचार करतों ' ह्मणून ह्मणाले, त्याचप्रमाणें माझ्या लेखांत कोठें चूक असल्यास ती दाखविण्याविषयीं त्यांची सर्वांना प्रार्थना आहे, तेव्हां त्यांचे लेखमालेप्रमाणें थिऑसफिकल सोसायटीचा सभासद या नात्यानें आपणही त्यांनीं स्वीकारलेल्या निरनिराळ्या विषयांचा आपला अल्प विचार महाराष्ट्रबंधूंपुढें शांतपणें विचाराकरितां मांडावा असें माझ्या मनांत आलें व या विचारानें मी हे लेख लिहीत आहें.

विषयाचे सोईसाठीं रा. काळे यांचे दुसऱ्या लेखांकापासून सुरुवात करूं. लेखांक १ व ७ यांतील विषय एकच असल्यामुळें त्यांचा विचार एके ठिकाणीं करूं. लेखांक २ व ३ यांत रा. काळे यांनीं बेझंटबाईच्या पूर्व व उत्तर चरित्रक्रमाविषयीं व महात्म्याचें अस्तित्व व त्यांजकडून येणारे संदेश यांविषयीं विवेचन केलें आहे, तेव्हां बेझंटबाईच्या चरित्रक्रमाविषयीं रा. काळे काय लिहितात तें प्रथम पाहूं.

## बेझंटबाईचा चरित्रक्रम.

ते म्हणतात:—

( अ ) 'ज्या माणसांच्या नादीं आह्मी लागतों तीं आमच्या हिंदुधर्ममतांप्रमाणें आमच्या आदरास व पूजेस पात्र आहेत काय ? हें आह्मी पाहण्यास नको काय ?'

( ब ) 'अशा प्रकारें सुरळीतपणें संसार चालला असतां एकाएकीं या बाईनीं घर, दार, नवरा व अपत्य इत्यादि टाकून दिलीं व लंडन येथील ( Free Thought ) स्वतंत्र-विचारवाल्या मंडळांत आपला समावेश करून घेतला. '

मॅडम ब्लॅव्हॅट्स्की व बेझंटबाई या दोघींना उद्देशून ते पुनः लिहितात:-

( क ) ' या बायकांचें चरित्र तरी काय वर्णन करावें ! यांनां आपले नवरे वगैरे सोडून देऊन भटकणें पत्करलें ! या बायकांना हिंदूंनीं मान द्यावा का ? हिंदु लोक ज्या बायका विवाहित असून त्यांना (पतिपुत्रादिकांना) टाकून पळून जातात व नंतर दुसरीं लग्नें वगैरे कुलंगडीं करतात, त्यांस पूज्य व आदरणीय मानितात काय ? वगैरे वगैरे. '

या वरील विधानावरून रा० काळे यांनीं या दोन्ही बायकांचीं चरित्रें मुळींच वाचिलीं नाहींतसें दिसतें. आतां वस्तुस्थिति काय आहे तें आरण पाहूं.

बेझंटबाईनीं लग्न केलें. तें प्रथम केवळ आपल्या मातोश्रींनीं आपल्या भावि पतींना वचन दिलेलें होतें म्हणून. मातोश्रींचे वचनास बाध येऊं नये व लग्न होणार आहे ते धर्मोपाध्यायाशीं, तेव्हां त्यांच्याशीं लग्न झाल्यानें आपल्याला पुष्कळ धार्मिक व परोपकाराचीं कृत्यें करण्यास सवड मिळेल या हेतूनें त्यांनीं लग्नास रुकार दिला. विवाहानंतर थोडयाच दिवसांत या सर्व कल्पना भ्रममूलक ह्मणून त्यांचे नजरेस आल्या, त्यांचा पति व त्या यांचे स्वभावांत दक्षिणोत्तर दिशांचेंच साम्य होतें असें पुढें आढळलें. त्यांतून बाई वयानें व बुद्धीनें जशा प्रौढ होऊं लागल्या, तशी त्यांची मानसिक व बौद्धिक वाढ होऊन ख्रिस्ती धर्मांतील निरनिराळ्या मतप्रतिपादनांविषयीं व समजुतींविषयीं त्यांना शंका येऊं लागल्या. कांहीं तर त्यांना अग्राह्य वाटूं लागल्या. अशा स्थितींत निरनिराळीं धर्मकृत्यें त्यांजवर आपला विश्वास नसतां करीत राहणें म्हणजे आपण आपणां स्वतःस व इतरांस फसविणें व दांभिकपणा करणें आहे असें त्यांना वाटूं लागलें. तेव्हां तीं तीं धर्मकृत्यें त्या करीतनाशा झाल्या. त्यामुळें त्यांचें व त्यांच्या पतीचें मुळींच पटेनासें झालें. रोज भांडणें सुरू झालीं. याप्रमाणें सहा वर्षें लोटलीं. धर्मोपाध्यायाची बायको व तिचीं अशीं मतें व असें वर्तन ह्मणून गांवांत बरीच चर्चा सुरू झाली. या परिस्थितीनें आपल्या नोकरीवर व अन्नावर पाणी पडेल या भीतीनें त्यांचे पतीनें त्यांचा अखेर जबाब मागितला. या स्थितीसंबंधीं बाई लिहितातः—

( 1 ) ‘ At last in July or August 1873 the crisis came. I was told that I must conform to the outward observances of the Church and attend the Communion. I refused. Then came the distinct alternative; conformity or exclusion from home,—in other words, hypocrisy or expulsion. I chose the latter. (Autobiography, page 117. )

**अर्थ**--‘ सरतेशेवटीं सन १८७३ चे जुलई किंवा आगष्ट महिन्यामध्यें आणीबाणीची वेळ येऊन ठेपली. मला सांगण्यांत आलें कीं, धर्मसंबंधीं जीं लौकिक नित्यनैमिक कर्में आहेत तीं मीं आचरिलींच पाहिजेत. ‘ कम्यूनियन ’ चे विधीचे वेळीं मीं हजर राहिलेंच पाहिजे. हें मीं नाकारिलें. त्यानंतर सोक्ष कीं मोक्ष अशी स्थिति आली. एकतर धर्माचरण करावें नाहींतर घरांतून हाकलपट्टी सोसावी--सारांश, भोंदूपणा स्वीकारावा अगर घरास रामराम ठोकावा. मीं दुसरा मार्ग पत्करिला. ’ ( आत्मचरित्र पान ११७. )

यानंतर त्यांचे पतीनें कोर्टमार्फत काडी मोडून न देतां फक्त Legal Separation ( पतिपत्नीनें वेगवेगळें राहणें ) चा कागद करून बेझंटबाईंना आपल्या घरांतून घालवून दिलें. **याप्रमाणें बेझंटबाईंनीं आपल्या पतीला व घरादाराला आपण होऊन टाकून दिलें, असें नसून त्यांचे पतीनें त्यांना टाकून त्यांना घराबाहेर घालविलें** अशी वस्तुस्थिति आहे.

( हा सर्व मजकूर त्यांचे आत्मचरित्राचें पान ७० ते ११९ वर सांपडेल. )

याप्रमाणें पतींनीं घराबाहेर घालवून दिल्यावर बेझंटबाई आपल्या मातोश्रींजवळ राहूं लागल्या. कांहीं काळानें त्याही वारल्या. यापुढें बाईंनीं मोलमजुरी करून आपला व मुलांचा उदरनिर्वाह, पुष्कळ उपासमार सोसून केला. अशा स्थितींतसुद्धां त्यांनीं मोठ्या धीरानें व उत्साहानें धर्मग्रंथांचा अभ्यास कायम ठेविला, इतक्यांत **त्यांच्या पतींनीं कोर्टांत दावा करून त्यांचीं दोन अपत्येंही आपल्या ताब्यांत घेतलीं, तेव्हां बाईंनीं आपलीं अपत्यें टाकून दिलीं, हें म्हणणें वृथा होय.** ( Autobiography पान२०३ ते २१८पहा.) अशी स्थिति असतां आपल्या पतींना व अपत्यांना बाईंनीं टाकून दिलें असें म्हणणें म्हणजे **सत्याचा विपर्यास** होय. यानंतर बेझंटबाईंनीं कधीं दुसरें लग्नही केलें नाहीं, अथवा दुसरीं कुलंगडींही केलीं नाहींत.

प्रसिद्ध राष्ट्रभक्त बाबू बिपन चंद्रपाल हे त्यांनीं नुकत्याच सुरू केलेल्या " हिंदु रिव्ह्यू " ( Hindu Review ) नामक आपल्या मासिकाचे एप्रिल १९१३ चे अंकांत बेझंटबाईबद्दल लिहितातः–

( 2 ) Such perfect attunement between body and soul is a proof of the purity of her life. According to Hindu experience it is impossible to acquire a physical constitution like that of Mrs. Besant's without the strictest observance of the disciplines of Brahmacharya.......Indeed it has sometimes seemed to me as I read her life among free thinkers and secularists that she has been built differently from ordinary men and women, and is constitutionally free from the vulgar cravings of our common flesh. '

( २ ) शरीर व आत्मा यांची एवढी पूर्ण एकतानता, ही त्यांच्या जीवनपावित्र्याची साक्ष होय. हिंदुधर्मशास्त्रानुभवाप्रमाणें बेझंटबाईंच्या प्रकृतीप्रमाणें, प्रकृति संपादन करणें हें ब्रह्मचर्याचे कडकडित आचरणाशिवाय अशक्य आहे..........स्वतंत्रविचारमतवादी व जडवादी यांचेमध्यें त्यांनीं घालविलेलें जीवनचरित्र वाचलें म्हणजे कित्येक वेळां खरोखर असें वाटलें आहे कीं, या बाईंची प्रकृतिरचनाच साधारण स्त्रीपुरुषांहून भिन्न आहे व शरीरजन्य क्षुद्र विकारांपासून त्या जात्याच मुक्त आहेत. "

ज्यांनीं ज्यांनीं बेझंटबाईंची या उतार वयांतसुद्धां अखंड कार्यक्षमता व देहाची दिव्यकांति पाहिली असेल त्यांना ह्या सत्योक्तीचें प्रत्यंतर तावडतोब मिळेल.

आतां मॅडम ब्लॅव्हॅट्स्की बाईंविषयीं पाहिलें तर यांना अपत्यें कधींही झालीं नाहींत, तेव्हां त्या टाकून कोणतीं देणार ! लग्न झालें, तें लग्न म्हणून नव्हे तर आपल्या दाईनें आपल्या स्वरूपाबद्दल केलेल्या निर्भर्त्सनेला खोडून टाकण्याकरितां केलें. पण त्यांचें देशाच्या रिवाजाप्रमाणें मागणीपर्यंत गोष्ट आल्यावर लग्न झालेंच पाहिजे असें कळलें. तेव्हां त्यांनीं जुलमाचा रामराम म्हणून उघड्या डोळ्यांनीं साठ वर्षांच्या म्हाताऱ्याबरोबर लग्नविधि होऊं दिला. पण पतीबरोबर कधींही त्या राहिल्या नाहींत. तर आत्मविद्येच्या गुरूंच्या शोधार्थ उन्हातान्हांतून, पावसापाण्यांतून, अरण्यांतून, गिरिकंदरांतून सर्व पृथ्वीतलावर प्रवास केला व आपणास कृतार्थ करून दुसऱ्यां शेंकडों हजारों लोकांस कृतार्थ करून सोडिलें.

दुसरें लग्न आपल्या उतार वयांत एका गृहस्थाचे केवळ लहरीकरितां ' लग्न न केलेंस तर मी जीव देईन ' असें म्हणाला, म्हणून होऊं दिलें. पण हें लग्न कोणत्याही तऱ्हेनें प्रापंचिक असणार नाहीं असा त्याजवळ करार केला; पण त्याची पशुवृत्ति प्रकट झाल्याबरोबर दुसऱ्या दिवशीं त्याला सोडून त्या निघून गेल्या. पुढें त्यानें कोर्टमार्फत काडी मोडून आपला लग्नसंबंध सोडवून घेतला ( Old Diary Leaves, Vol. 1, Pages 55–57 ).

आतां सत्यशोधनाकरितां, आत्मशोधनाकरितां, देवशोधनाकरितां, हव्यास धरिलेल्या माणसांनीं पति, पुत्र, कलत्र, गृह इत्यादि संसारबंधनांविषयीं किती पर्वा ठेवावी व ती तोडून टाकिली असतां तीं माणसें कितपत दोषार्ह समजलीं

जातात, हें आपण आपल्या हिंदुधर्ममतांप्रमाणें पाहूं. पतिपत्नी, पितापुत्र, मातापुत्र, बंधुभगिनी वगैरेसंबंधांपासून उत्पन्न होणारे प्रांपचिक धर्म हे कौटुंबिक व सामाजिक होत व ते कुटुंबाच्या व समाजाच्या परिस्थितींत व त्यांचे स्थैर्यास व कल्याणास आवश्यक होत, व म्हणून परिपाळनीय आहेत. पण जीवेश्वरधर्माच्या दृष्टीनें त्यांचें गौणत्व स्पष्टपणें सर्व धर्ममतांतून सांगितलेलें आहे. खिस्ती व महमदी म्हणून आमच्याहून कनिष्ठ म्हणून मानल्या जाणाऱ्या धर्ममतांमध्यें सुद्धां या गोष्टीचा अनुवाद केलेला आहे, तर मग श्रेष्ठ अशा आमच्या हिंदु धर्माची गोष्ट कशाला ? श्रीकृष्ण सांगतातः—

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।

—भगवद्गीता. अ. १८ श्लो. ६६.

महाराष्ट्रांतील आदर्शसंत व राजगुरु श्रीसमर्थ म्हणतात:—

देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।<br>
सर्व अर्पावें सेवटीं । प्राण तोही वेंचावा ॥

—श्रीमद्दासबोध ४।८।८.

अशी ही संतांची शिकवणूक आहे, आतां प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत भक्तांची व साधूंची वर्तणूक कशी आहे ती पाहूं. भगवान् गौतम बुद्धांनीं पूर्णसुखांत असतां आपली पत्नी, मुलगा, आई, बाप, राज्य वगैरे सर्व सोडून कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय धनावर पाणी सोडून ते जोगी बनले व बुद्धस्थितीप्रत जाते झाले व त्यांची हिंदुधर्मीयांनीं विष्णूच्या दशावतारांमध्यें गणना केली; राजा गोपीचंदानेंही तशाच स्थितींत घरदार, बायका, पोरें सोडून योगाचरण केलें व चिरंजीवित्व प्राप्त करून घेतलें; तर राजा बिभीषणानें भ्रातृद्रोह करून दाशरथी श्रीरामाचें सख्यत्व संपादन केलें; तुकाराममहाराजांनीं बायकापोरांना सतत दारिद्र्यांत ठेवून भजनानंदाचा स्वीकार केला; चांगुणेनें आपल्या पोटच्या चिलयाबाळाला आपल्या हस्तांनीं कांडून साधुरूपी शिवाला भक्षणार्थ अर्पण केलें; तर बोधराज संतांनीं आपली सून साधुरूपी विठोबाच्या स्वाधीन केली; प्रल्हादानें पित्यावर पाठ फिरविली; तर भक्तशिरोमणि व्रजांगना गोपिका आपले नवरे, मुलें, घरेंदारें सोडून रात्रीं बेरात्रीं श्रीकृष्णाच्या चरणकमलाचा आश्रय घेऊन जीवेश्वरयोगाचें श्रेष्ठ व अतींद्रिय सुख अनुभवित्या झाल्या व याच नवरे सोडलेल्या गोपिकांकडे त्यांचेजवळून भक्तिज्ञान संपादण्याकरितां ज्ञानघन उद्धव यांची प्रत्यक्ष श्रीकृष्णांनीं पाठवणी केली. याप्रकारें

जीवेश्वरधर्म हा इतर कोणत्याही धर्माहून श्रेष्ठ होय. व त्याचे परिपालनाकरितां कोणीही आड आल्यास त्याची पर्वा कोणत्याही देशांतील, कोणत्याही धर्मांतील भक्तांनीं केलेली नाहीं. बेझंटबाईंनीं आत्मशोधनाकरितां काय उद्योग केला, काय हाल, आपत्ति व अपमान सहन केले हें त्यांचें चरित्र वाचून व पाहूनच कळणार आहे. एरव्हीं कळणें अशक्य आहे.*

## लेखांक २.

## बेझंटबाईंचीं मतांतरें.

गेल्या लेखांत बेझंटबाईंचा चरित्रक्रम पाहिला. आतां त्यांचे मतांतरांविषयीं विचार करूं. कारण रा० काळे यांचा दुसरा आक्षेप त्यांबद्दलचा आहे. त्यांचें ह्मणणें बाई प्रथम भक्तिपूर्ण ख्रिस्तमतानुयायी, नंतर नास्तिक, नंतर (Socialist) समाजहितवादी व तद्नंतर थिऑसफिस्ट झाल्या, त्या केवळ त्यांच्या उच्छृंखल, उडाणटप्पू, लहरी, अंधश्रद्धा वगैरे वृत्तींच्यामुळें झाल्या. या मतांतरांची खुद्द बाईची बाईनाच उपपत्ति लावितां येत नाहीं ! याही लिहिण्यावरून रा० काळे यांनीं बाईचें चरित्र वाचल्याचें अगर समजून घेतल्याचें दिसत नाहीं. वस्तुस्थिति कशी आहे ती आपण पाहूं.

---

*वरील लेखांक प्रसिद्ध झाल्यावर व पुनः लेखमाला संपल्यावर अमळनेरचे वकील रा० जावडेकर यांनीं इंदुप्रकाशांत मला उत्तरादाखल लेख लिहिले. त्यांचा सारांश हा होता कीं, गौतमबुद्ध, गोपीचंद, उद्धवादी पुराणप्रसिद्ध विभूतींची उपमा बेझंटबाईंना देऊन चालावयाची नाहीं.उपमा व उपमेय यांमध्यें जमीनअस्मानाचा फरक आहे. वाचकांचे हें लक्षांत येईल कीं, विवक्षित कालीं बेझंटबाईंनीं स्वीकारलेलें वर्तन अथवा प्रकट केलेलीं मतें हीं आपल्या आर्यधर्मतत्वांना धरून आहेत कीं नाहीं एवढाच प्रश्न आहे. आधारांत घेतलेल्या विभूतींच्या बरोबरीच्या बेझंटबाई आहेत कीं नाहीं हा प्रश्न नाहीं. व तसें मीं कधींही म्हटलेलें नाहीं. बाईचे मतांबद्दल अगर वर्तनाबद्दल शास्त्राधार आहे कीं नाहीं हा प्रश्न आहे. प्रथम शास्त्राधार आहे का ? ह्मणून पृच्छा करावयाची व मग आधार दाखविल्यावर त्यांतील विभूतींची व प्रस्तुत व्यक्तींची तुलना होऊं शकत नाहीं म्हणून म्हणावयाचें, म्हणजे वादविवादपद्धतीविषयीं पूर्ण अज्ञान प्रकट करणें होय.

प्रथमतः बाई भक्तिपूर्ण ख्रिस्तमतानुयायी होत्या हें खरें आहे. पण अशी स्थिति कोठेंही जन्मसिद्ध धर्ममताविषयीं बहुतेकांची असते. त्या जशा वयानें व अनुभवानें प्रौढ होत चालल्या, तसा त्यांच्या मानासिक शक्तींचा विकास होऊन त्या निरनिराळ्या मताविषयीं बौद्धिक दृष्टीनें विचार करूं लागल्या. या दृष्टीनें त्यांनीं आपल्या धर्मग्रंथांचें अध्ययन सुरू केलें. असा क्रम चालला असतां कित्येक दिवसांनीं त्यांना ख्रिस्ती धर्मग्रंथांतील मुद्यांचे प्रतिपादनाबद्दल व समजुतींबद्दल शंका येऊं लागल्या व कित्येक अग्राह्य वाटूं लागल्या. त्यां-बद्दल त्यांनीं निरनिराळ्या धर्मोपाध्यायांना विचारणा केली. पण ‘ या शंका हीं पूर्वकृत पापांचीं लक्षणें आहेत व ह्मणून तुम्ही प्रार्थना करा, ’ या पलीकडे त्यांना जास्त माहिती व खुलासा मिळेना. एका उपाध्यायांनीं त्यांना ‘ No, no, you have read too much already ; you must pray ; you must pray. ’

( **अर्थः**—तुमचें वाचन अगोदरच वाजवीपेक्षां जास्त झालें आहे. तुम्हीं आतां प्रार्थनेवर जास्त भिस्त ठेविली पाहिजे,) असें आग्रहानें सांगितलें. त्यांना ज्या कित्येक मतांबद्दल शंका व असत्यभाव वाटूं लागला, त्यांपैकीं कांहीं त्यांनीं पुढीलप्रमाणें दिलीं आहेत.

( १ ) चालू असलेल्या थोड्या फार जीवितावकाशांत मनुष्याच्या हातून घडलेल्या पापपुण्यांप्रमाणें त्याला अक्षय्य स्वर्ग अथवा नरक मिळतो.

या मताप्रमाणें उपजतांच मृत झालेल्या अर्भकांना पाप अगर पुण्याच्या अभावीं कोणती गति मिळते ? त्याचप्रमाणें प्रत्येकाचें कर्म निव्वळ पापमय अथवा पुण्यमय नसतें. तेव्हां नुसता स्वर्ग अथवा नुसता नरक कसा मिळतो ? तसेंच ५०।६० वर्षांच्या अवधींत उत्पन्न झालेल्या पापपुण्यानें अक्षय्य सुखाची अथवा दुःखाची उत्पत्ति कां व कशी होते ?

( २ ) ईश्वर पूर्ण दयाघन व पूर्ण समर्थ असा आहे.

जगांत पहावें तों हाल, दारिद्र्य, रोग वगैरे अनिष्ट प्रकार प्रत्यक्ष अस्ति-त्वांत आहेत. ईश्वरामध्यें ते काढून टाकण्याचें सामर्थ्य आहे असें ह्मणावें, तर तो ते काढून टाकीत नाहीं. कारण ते अस्तित्वांत राहिले आहेत. तेव्हां तो पूर्णदयाघन होत नाहीं. आतां त्याचे अंतःकरणांत दया पूर्ण आहे असें म्हणावें, तर ते अस्तित्वांत आहेत तेव्हां ते काढून टाकण्याचें सामर्थ्य

त्यामध्यें नाहीं असें ह्मणावें लागतें, याप्रमाणें सिद्धांताला दोन्ही तऱ्हेनें बाध येतो. हींच शंका प्रसिद्ध तत्ववेत्ते मिल्ल यांना आली होती असें सांगतात.

( ३ ) सर्व पापी लोकांचे पापाकरितां, आपला देहत्याग सोसून येशू ख्रिस्तानें प्रायश्चित्त सोशिलें व त्या पापी लोकांना त्यांचे पातकापासून मुक्त केलें.

यांत एकानें पातक करावें व दुसऱ्यानें त्याचें फळ भोगावें व त्या भोगानें पापी पापापासून मुक्त व्हावा या गोष्टी बुद्धीला पटणाऱ्या नाहींत. ( आत्मचरित्र पान ९९ पहा. )

वरीलप्रमाणें शंकांपैकीं कांहीं होत्या व त्यांना वरीलप्रमाणें अयुक्त जबाब मिळाले, त्यामुळें तीं मतें, ज्या तऱ्हेनें प्रतिपादिलीं जात असत त्या तऱ्हेनें त्यांना अविश्वसनीय झालीं व स्वतंत्रमतवादी ( free thought ) मंडळांत प्रविष्ट झाल्या. तेथें त्यांनीं स्वस्थ न बसतां तत्वज्ञानावरील शेंकडों ग्रंथ वाचले; अनेक धर्ममतांचें व ग्रंथांचें परिशीलन केलें; रसायनशास्त्र, वनस्पति वगैरे निरनिराळ्या शास्त्रांचें अध्ययन करून त्यांच्या परीक्षा देऊन त्यांत उत्तीर्ण झाल्या; वर्तमानपत्रें चालविलीं; व्याख्यानें दिलीं. या मतांत असतां नास्तिक ह्मणून म्हटलीं जाणारीं त्यांचीं मतें काय होतीं हें त्यांच्या त्या वेळच्या लेखांतील उताऱ्यावरून समजेल.

'It is manifest to all who will take the trouble to think steadily that there can be only one Eternal and underived Substance, and that matter and spirit must therefore only be varying manifestations of this one Substance......

Deity cannot be conceived of as apart from the universe; that the worker and the work are inextricably interwoven...... The Deity becomes identified with nature co-extensive with the Universe but the God of the Orthodox no longer exists......... The Atheist does not say, there is no God; but he says I know not what you mean by God.' ( Autobiography, pages 141--144.)

' जे कोणी शांतपणें विचार करतील त्या सर्वांना हें स्पष्ट कळून येईल कीं, जगांत एकमेवाद्वितीय असें एकच तत्व आहे. पुरुष व प्रकृति हीं या तत्वाचीं दोन भिन्न स्वरूपें आहेत. जगदीश हा जगाहून भिन्न आहे अशी कल्पना शक्य नाहीं. कार्य व कर्ता हीं एकमेकांत गुंफिलेलीं आहेत. ईश्वर व सृष्टि यांचा

ऐक्यभाव होतो व एक दुसऱ्याशीं समव्याप्त होतो. पण अशा विचारपद्धतीनें पुराणमतवाद्यांचा ईश्वर व हा ईश्वर यांत भिन्नता येते.' "नास्तिक लोक ईश्वर नाहीं असें म्हणत नाहींत. ईश्वर म्हणजे तुम्ही काय समजतां हें त्यांना समजत नाहीं."

( आत्मचरित्र, पानें १४१ ते १४४. )

या नास्तिक अध्ययनानें बाईचे मनाचा विकास होऊन बुद्धीला थिऑसफीचें तत्वज्ञान ग्रहण करण्यास जरूर ती क्षमता व कुशाग्रता संपादन झाली. बाई म्हणतात—

( 1 ) And the position of the philosophic Atheist is so misunderstood that it is the more necessary to put it plainly, and theosophists, at least, in reading it, will see how Theosophy stepped in finally as a further evolution towards knowledge, rendering rational and therefore acceptable, the loftiest spirituality that the human kind can as yet conceive.'

हा सर्व बुद्धीचा प्रकार झाला. पण परोपकाराकडे जन्मसिद्ध प्रवृत्ति असलेल्या बेझंटबाईंची नुसत्या कोरड्या बुद्धिवादानें व ज्ञानानें अंतःकरणाची तळमळ जाईना. अंतःकरणांत समाधान वाटेना. अशा वेळीं मानवजातीचें बंधुत्व व सेवा हीं ज्या पंथांचीं ध्येयें अशा समाजहितवादी (Socialist) पंथाकडे त्यांनीं मार्ग क्रमिला. या पंथांत त्या गेल्या नसत्या तर विश्वबंधुत्व; व सर्व धर्ममतांचा, तत्वज्ञानाचा व शास्त्रांचा तुलनात्मक अभ्यास; हीं ज्या पंथाचीं ध्येयें त्या थिऑसफिकल सोसायटींत त्या कधीं आल्या नसत्या असें बाईचेंच म्हणणें आहे. Socialist पंथांत कार्य करीत असतां लंडनमधील गलिच्छ भागांत स्वतः जाऊन तेथें राहणाऱ्या अज्ञ, दरिद्री, दुर्व्यसनी अशा लोकांना लेखनद्वारां, व्याख्यानद्वारां, द्रव्यद्वारां बाईनीं साहाय्य केलें. या उद्योगानें त्यांची चित्तशुद्धि झाली. अंतःकरणांत एकंदर मानवजातीबद्दल अनुकंपेचा पाझर फुटला, पण अजून मानवांचे बंधुत्वाचा उगम कोठें व त्या मानवांकरितां निरपेक्ष रीतीनें सुखवस्तु माणसांनीं झटण्यास त्यांना कोठून स्फूर्ति देतां येईल, हें त्यांना कळेना. त्या वेळेबद्दल त्या लिहितात:—

'The Socialist position sufficed on the economic side but where to gain the inspiration, the motive, which should lead

to the Realisation of the Brother-hood of man? Our efforts to really organise bands of unselfish workers had failed.' ( Auto. 338 page ).

'Not only so; but since 1886 there had been slowly growing up a conviction that my philosophy was not sufficient, that life and mind were other than, more than, I had dreamed. Psychology was advancing with rapid strides; hypnotic experiments were revealing unlooked for complexities in human conscious ness; strange riddles of multiplex personalities; and most startling of all vivid intensities of mental action when the brain, that should be the generator of thought was reduced to a comatose state. Fact after fact came hurtling in upon me demanding explanation I was in-competent to give. I studied obscurer sides of consciousness, dreams, hallucinations, illusions insanity' ( Auto. p. 339 )

'समाजहितवाद्यांचें मत ( राष्ट्राचे ) सांपत्तिक बाजूचे दृष्टीनें पुरेसें होतें. पण मानवबंधुत्वाचा अनुभव येण्यास जरूर ती स्फूर्ति, तो हेतु कोठून मिळावा ( ही अडचण आली )? खऱ्या निरपेक्ष अशा कार्यकारी माणसांना जमविण्याबद्दलचे आमचे प्रयत्न वृथा गेले.

'एवढेंच नाहीं तर स. १८८६ पासून माझें तत्वज्ञान अपुरें आहे असें मला हळू हळू खात्री पटत चालली. जीव व मन हीं मी मानीत होतें त्याहून अन्य व अधिक आहेत, अशी खात्री होऊं लागली. मानसशास्त्राची झपाट्यानें वृद्धि होत होती. मोहनिद्रा, ( hypnotism ) शास्त्रांतील प्रयोगांनीं मानवांचे संवित् शक्तीसंबंधीं अनपेक्षित अडचणी व एकाच देहांत अनेक व्यक्तींचें अस्तित्व व या सर्वांहूनही अतिशय आश्चर्याची गोष्ट ह्मणजे विचारांचा उत्पादक ह्मणून समजला जाणारा मेंदू, अगदीं मंद स्तिमित स्थितीला आणिला असतांही मानसिक शक्तींचें वृद्धीभवन; या गोष्टी नजरेस येऊन त्यांनीं मजवर एकाएकीं हल्ला केला व गोंधळांत मजकडून माझ्या ज्ञानाचे संचयांतून तर जबाब गवसेना, मग मी मानसशास्त्रांतून, स्वप्नें, भ्रम, भान, वेड वगैरे कठिण विषयांचें अध्ययन केलें.'

अशा स्थितींत मि. ए. पी. सिनेट ( A. P. Sinnett ) या थिऑसाफिस्ट गृहस्थांनीं लिहिलेला (Occult world) 'गुप्तसृष्टि' हा ग्रंथ त्यांचे अवलोकनांत

आला. त्यायोगें सृष्टींतील गूढ व सूक्ष्म शक्तींचें अध्ययन करणारीं व प्रावीण्य मिळविलेलीं अशीं थोर देवमाणसें, महात्मे या भूतलावर आहेत व काम करीत आहेत अशी त्यांची खात्री झाली. इतक्या अवकाशांत त्या एके दिवशीं सायंकाळीं स्वस्थपणें गूढ विचारांत निमग्न असतां त्यांचे कानावर ध्वनि पडला कीं,

'सत्य समजण्याकरितां तूं सर्वस्व अर्पण करण्यास तयार आहेस काय ! ' ( Are you willing to surrender every thing in order that you may know the truth ? ) त्यास त्यांनीं ताबडतोब जबाब दिला कीं, 'अर्थात् मला तेंच पाहिजे.' (Surely that is all I need. ) पुनः ध्वनि झाला कीं, (Is there nothing that you hold back.) 'तुझा जीव गुंतेल असें कांहीं नाहीं ना !' (Will you let all go ?) 'तूं सर्वस्वत्याग करशील ना! ' पुनः त्यांनीं जबाब दिला: ' जर मला सत्यज्ञान होईल तर असें कांहींच नाहीं कीं, जें मी अर्पण करण्यास तयार नाहीं.' (There is nothing I will not surrender it I can only know ) यावर लागलीच करुणामय व मंजुळ असा पुढील ध्वनि कानीं पडला कीं, (Within a very little time the light shall arise) 'तर मग लवकरच ज्ञानोदय होईल!' ( "Initiation and Perfecting of Man", page, 30–31 ).

यानंतर कांहीं थोडेच दिवसांत त्यांचे स्नेही प्रसिद्ध लेखक मि॰ स्टेड यांनीं ब्लॅव्हॅट्स्की बाईंनीं लिहिलेला 'Secret Doctrine,' 'गुप्त विद्या' नामक प्रचंड ग्रंथ टीका लिहिण्याकरितां बाईंचे स्वाधीन केला; व बाईंनीं तो समग्र वाचून पाहिला. त्यांतील विवेचन वाचून त्यांना जणूं काय पूर्वजन्मांतरीं मिळविलेल्या ज्ञानाची उजळणीच चालली आहे असें वाटलें. त्यांनीं मॅडम ब्लॅव्हॅट्स्की बाईंची भेट घेतली व त्यांचें शिष्यत्व पत्करिलें.

याप्रमाणें बाईंचे मतांतरांचा इतिहास आहे. यांत उच्छृंखल, उडाणटप्पू, लहरी व अंधश्रद्धा वगैरे वृत्तींचा कोठें भाग आहे तें वाचकांनीं स्वतः मनन करून ठरवावें. माझ्या मतें या इतिहासांत मनाचा व बुद्धीचा पूर्ण व्यवस्थित व शास्त्रीय पद्धतीचा विकास झाल्याचाच प्रकार आहे. रा. काळे मात्र एक अखेरचें अवतरण देऊन अंधश्रद्धा व अव्यवस्थितपणा दाखवूं पहातात, पण तें व्यर्थ आहे. आतां बाबू बिपिनचंद्र पाल यांचा मागें निर्दिष्ट केलेल्या लेखांतील एक उतारा देऊन हा लेख संपवितों:—

'Superficial observers charactrised Mrs. Besant's sudden conversion from rank atheism and secularism of the Bradlaugh School to Theosophy of Madame Blavatsky as a wild summer-sault. But on careful analysis it will be found I think *as a most easy and logical process of regular development.*'

( **भावार्थ**–ब्रॅडलॉसाहेबांचे गाढ नास्तिक्यवादापासून ब्लॅव्हॅट्स्की बाईंचे थिऑसफीकडे बिझांटबाईंचें जें एकदम मतांतर झालें त्याबद्दल वरवर पहाणारास विलक्षण असंबद्धपणा दिसला, पण मला वाटतें कीं काळजीपूर्वक व्यवच्छेद केल्यास तें सहज व सुसंबद्ध रीतीनें घडून आलें असें आढळेल. )

---

## लेखांक ३.

## महात्मे व त्यांचे संदेश.

रा. काळे यांचे लेखांक ३ मध्यें त्यांनीं थिऑसफिकल वाङ्मयांत ज्याच्याविषयीं नेहमीं उल्लेख असतो ते महात्मे, त्यांचें अस्तित्व व त्यांचेकडून येणारे संदेश यांविषयीं विचार केला आहे.

थिऑसफीचे वाङ्मयांत महात्मा या पदाचा विवक्षित उपयोग ' जीवन्मुक्त व्यक्ति ' अशा अर्थानें रूढ केलेला आहे. या जगाचे पाठीवर मुक्त स्थितीप्रत पोंचून, केवळ जगाच्या कल्याणाकरितां आपला स्थूल देह कायम ठेवून आपण स्वतः अगर आपल्या शिष्यांकरवीं ज्यांनीं या जगामध्यें अध्यात्मविद्येची ज्योत पाजळती ठेविली आहे असे मुक्त पुरुष अथवा ऋषि या जगांत आहेत. या गोष्टींविषयीं कोणत्याही हिंदुधर्माचा अभ्यास करणाऱ्या व त्यावर विश्वास असणाऱ्या गृहस्थांस ( रा० काळे यांसही ) शंका असेलसें वाटत नाहीं. ( ज्या कित्येकांस तीही शंका असेल त्यांना अन्य प्रमाणें देऊन त्यांचें समाधान करावें लागेल. * मात्र त्यांचे मनांतील खरी शंका अशी कीं, असे मुक्त पुरुष अस-

---

*टीपः—हा लेखांक मुमुक्षूमध्यें प्रसिद्ध झाल्यावर त्याच पत्राचे ता० ३१-७-१३ चे अंकांत ब्रह्मविद्याग्रंथरत्नमालेचे संपादक विष्णुशास्त्री बापट यांनीं मला उद्देशून पृच्छा केली कीं, ' जीवन्मुक्त आपला स्थूलदेह केवळ जगाच्या कल्याणाकरितां कायम ठेवितो ' व असे ऋषि ' हिमालयांत लपून राहून

तील अथवा आहेत; पण त्यांच्यापैकीं कांहींकांशीं थिऑसफिस्टांपैकीं कोणाचा दर्शनद्वारां, संदेशद्वारां वगैरे संबंध आहे कीं नाहीं, हा प्रश्न आहे. तसा संबंध असल्यास त्याबद्दल पुरावा काय ? हिंदुस्थानांतील तीस कोटी प्रजेपैकीं एकाही हिंदी गृहस्थाशीं असा संबंध नाहीं हें कसें ? यांपैकीं एकसुद्धां त्यांच्या प्रसादास पात्र नाहीं कीं काय ? हें सर्व निवळ थोतांड आहे. मॅडम ब्लॅव्हॅट्स्की ही महाठक होती. आपण स्वतः पत्रें लिहून तीं महात्म्यांकडून आलेलीं आहेत असें

---

आपण स्वतः किंवा आपल्या शिष्यांकरवीं या जगांमध्यें अध्यात्मविद्येची ज्योत पाजळती ठेवितात ' या म्हणण्यावर त्यांचा विश्वास नाहीं. कारण वैदिक वाङ्मयांत तसा उल्लेख कोठें आढळत नाहीं.

आतां याबद्दल सदरहु वाङ्मयाचे दृष्टीनें विचार करूं. जीवन्मुक्त व विदेहमुक्त हे मुक्तांचे दोन प्रकार प्रसिद्ध आहेत. स्थूलदेह पडण्याचे पूर्वीं झालेले मुक्त पुरुष पहिल्या प्रकारचे. त्यांचा देह पडल्यावर त्यांना विदेहमुक्त म्हणतात. आतां या जीवन्मुक्त स्थितींत ते पुरुष कां रहातात, हा प्रश्न राहिला. विद्यारण्यस्वामींचा ' जीवन्मुक्तिविवेक ' हा ग्रंथ सर्वप्रसिद्ध असा वेदांतावर वैदिक ग्रंथ, आहे. त्यांत प्रथम प्रकरणांत स्वामी म्हणतात, ' स्मृतिषु जीवन्मुक्त स्थितप्रज्ञा भगवद्भक्त, गुणातीत, ब्राह्मणातिवर्णाश्रमादि नामभिस्तत्र व्यवह्रियते ।।

**अर्थ**:—स्मृतिग्रंथांतून, जीवन्मुक्त, स्थितप्रज्ञ, भगवद्भक्त, गुणातीत, ब्राह्मण, अतिवर्णाश्रम, आदिकरून नांवें समानार्थीं उपयोजिलीं जातात.

असल्या अधिकारी पुरुषांचें वर्णन श्रीमद्भागवतांत सहाव्या स्कंदांतील पंधराव्या अध्यायांत पुढीलप्रमाणें आहेः—

चरंति ह्यवनौ कामं ब्राह्मणाः भगवत्प्रियाः ।
मादृशां ग्राम्यबुद्धीनां बोधायोन्मत्तलिंगिनः ॥
कुमारो नारदऋभुरंगिरादेवलोऽसितः।
... ... ... ... ...
एते परे च सिद्धेशाः चरन्ति ज्ञानहेतवः ॥

अर्थः—' या पृथ्वीवर माझ्यासारख्या **ग्राम्यबुद्धीच्या बोधानुग्रहाकरितां** उन्मत्तवृत्तीचे, भगवत्प्रिय असे ब्राह्मण वस्ती करून आहेत.

असें नारद व अंगिरा या ऋषींना पाहून राजा चित्रकेतु म्हणाला व तदनंतर सनत्कुमार, नारद, व्यास, मार्कंडेय, गौतम, वसिष्ठ, पराशर, मैत्रेय, भरद्वाज वगैरे ऋषींचीं नांवें घेऊन तो म्हणाला ' एते परेच सिद्धेशाः चरंति ज्ञानहेतवः '— अर्थः— ' हे व इतर **सिद्धपुरुष ज्ञान देण्याच्या हेतूनें आहेत.** '

त्याचप्रमाणें श्रीशंकराचार्य म्हणतातः—

जगांत प्रसिद्ध करीत असे. तिनें अड्यार येथील सोसायटीचे देवालयांत मॅडम कोलंब व तिचा नवरा यांचे साहाय्यानें कांहीं कृत्रिम कपाटांची, तारांची, स्प्रिंगांची व बाहुल्यांची योजना केली होती व त्यांचे साहाय्यानें ती लोकांस महात्मे दाखवी व पत्रें आणी व अशा तऱ्हेनें तिनें अनेकांना फसविलें. हें तिचें सर्व थोतांड Society for Psychic Research या मंडळाचे एजंट डॉ० हॉगसन यांनीं हिंदुस्थानांत येऊन चौकशी करून बाहेर काढलें. मॅडम ब्लॅव्हॅट्स्की, बेझंटबाई व लेडबीटर अशी एक महाठकांची परंपरा आहे. थिऑसाफिकल सोसायटीचे सभासद हीं भोळवट मेंढरें आहेत व हा सर्व एका बाजूनें ठकबाजी व दुसऱ्या बाजूनें अंधश्रद्धा यांचा परस्पर खेळ आहे वगैरे वगैरे. य विचारांवरून पुन: असें म्हणणें भाग येतें कीं, रा० काळे यांनीं यासंबंधींचे थिऑसफिस्टांचे लेख मुळींच वाचले नसून प्रतिकूल लोकांचे लेख मात्र वेदतुल्य ग्रहण करून त्यांतील विचारांचा स्वतः चिकित्सा न करतां नुसता अनुवाद केला आहे. आतां आपण या प्रश्नांचा विचार वास्तविक काय आहे तो पाहूं.

---

‘ शांता महांतो निवसंति संतो वसंतवल्लोकहितं चरंतः ।
तीर्णास्स्वयं भीमभवार्णवं जनानहेतुनान्यानपि तारयंतः ॥

**अर्थः**—शांत, उदारधी, असे संत स्वतः भयंकर भवार्णवांतून तरून जाऊन दुसऱ्या लोकांनाही तारतात व याप्रमाणें अहेतुक रीतीनें वसंताप्रमाणें लोकहिताचें आचरण करितात. त्याचप्रमाणें प्रत्येक मन्वंतरांतील प्रजांचे रक्षणाकरितां व अधिशासनाकरितां एक मनु व धर्मोपदेशाकरितां सप्तऋषींची योजना असते, ही सर्वप्रसिद्ध गोष्ट वाटेल तें पुराण वाचून खात्री पटणारी आहे.

शास्त्रीबुवांनीं ही शंका घेतली याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. पण एक वाक्य त्यांचे लेखणींतून न निघतें तर बरें झालें असतें. दुसऱ्यांच्या लेखांवर टीका करतांना कां होईना, पण वरील शंकेंत ‘ **हिमालयांत लपून राहून** अध्यात्मविद्येची ज्योत पाजळती ठेवितात ’ असे ऋषींच्याबद्दल अनादराचे शब्द त्यांनीं लिहावयाचे नव्हते ऋषी हिमालयांत ‘ लपून राहून ’ आपलें कार्य करीत आहेत, असें वाक्य माझें नाहीं तेव्हां त्यांचे ‘ लपून राहण्याला ’ वैदिक वाङ्मयांतील आधार दाखविण्याची जबाबदारी मजवर नाहीं. मात्र हिमालयांत भगवान व्यासांचा बदरिकाश्रम आहे; नरनारायण ऋषि हिमालयावर तप करीत आहेत; मरू व देवापि हे हिमालयांत कलापग्रामीं वसति करून आहेत. या गोष्टी सर्व पुराणसमंत आहेत. असले अनादरयुक्त उद्गार ब्रह्मविद्याग्रंथरत्नावर परिश्रम करीत असलेल्या शास्त्रीबुवांच्या लेखणींतून निघावे, ही दुःखाची गोष्ट आहे.

रा. काळे ह्मणतात, ' मॅडम ब्लॅव्हॅटस्की नेहमीं म्हणत असे कीं, महात्मे काश्मीर पास मध्यें आहेत. ' बेझंट ह्मणते कीं, 'ते शिगॅटसीजवळ आहेत.' त्याचप्रमाणें मि० रॉकहिल, तिबेटांतील एक प्रवासी व युनायटेड स्टेट्स लिगेशनचे सेक्रेटरी यांनीं तिबेटांत ह्मातान्या, लामाशीं व इतरांशीं महात्म्यांविषयीं पुष्कळ चौकशी केली. पण त्यांना कांहीं पत्ता लागला नाहीं व तेथील लोक या प्रश्नाचे विचित्रपणाबद्दल हंसले मात्र; वगैरे वगैरे. यावरून रा. काळे यांचें अनुमान कीं, थिऑसफिस्ट म्हणतात, ते महात्मे मुळीं अस्तित्वांतच नाहींत रा० हरि रघुनाथ भागवत तर ह्मणतात, ' हे महात्मे कोठें आहेत, त्यांचीं नांवें काय, त्यांचें वय किती, ते कोणत्या धर्माचे आहेत इत्यादि माहिती थिऑसफोच्या अंतःशाखेंत शिरलेल्या लोकांपैकीं देखील फार थोडयांना ठाऊक आहे असें सांगतात. '

प्रथमतः महात्म्यांचे निवासस्थानाबद्दल विचार करूं.महात्मे, ऋषी, जीवन्मुक्त पुरुष हे आधीं पृथ्वीचे पाठीवरील एकाच देशांत अगर एकाच ठिकाणीं नसून ते निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या गिरिकंद्रांत,निरनिराळ्या अरण्यांतून वास करीत असलेले व निरनिराळ्या वर्णाचे, जातींचे, देह धारण केलेले असे आहेत. तेव्हां त्यांचे निवासस्थानांसंबंधीं उल्लेख निरनिराळे असणें अगदीं स्वाभाविक आहे. निरनिराळ्या महात्म्यांचे निवासस्थानांसंबंधीं बेझंटबाई लिहितातः—

" They live in different countries scattered over the world. The Master Jesus lives mostly in the mountains of Lebanon; the Master Hilarion in Egypt;--he wears a Cretan body; Masters M.andK. H.in Tibet, near Shigatse, both using Indian bodies Master Rakoczi in Hungary but travelling much. I do not know the dwelling places of the ' Venetian ' and the Master ' Serapis Dwelling place of the physical body seem to mean so little when the swift movements of subtle body, freed at will from the grosser one, carry the owner whither he wills at any time. Place loses its ordinary significance, to those who are free denizens of space coming and going at will.

( पहा Masters पानें ६२-६३. )

' The Old Gentleman of Tiruvallur, ' that H. P. Blavatsky named thus quaintly, visited in his Nilgiri retreat by Subba Rao and C. W. Leadbeater. "

( पहा. Masters पान ६३. )

आद्य श्रीशंकराचार्यांचे निवासस्थानाबद्दल मॅडम ब्लॅव्हॅट्स्की लिहितातः—
' Still it is maintained that this Adept of Adepts lives to this day in his spiritual entity, as a mysterious, unseen, yet overpowering Presence, among the brotherhood of Shambhalla *beyond, far beyond the snowy capped Himalayas.'*

( पहा. Secret Doctrine Vol. 3, page 385. )

आतां मि० रॉकहिल यांचे शोधांसंबंधीं, रॉकहिल यांचेसारख्या राजकारणी पुरुषाला तिबेटासारख्या परकीय देशांतील लामा अगर दुसऱ्या लोकांकडून या बाबतींत विश्वसनीय माहिती लागणें अशक्य. तशांतून महात्मे हे बहुधा साधारण मनुष्यांना अगोचर व अगम्य अशा ठिकाणीं राहतात. बाहेरील वस्तींत बहुधा येत नाहींत व आले तरी त्यांना ओळखण्यास जरूर ती चित्तशुद्धि कितीकांची असणार ! त्यांना कांहीं चार हात व दोन डोकीं नाहींत. तेव्हां शरीराचे वैलक्षण्यानें ओळखतां येतील ! त्यांचें व साधारण माणसांचें वैलक्षण्य म्हणजे बुद्धिसामर्थ्य व पूर्ण नीतिमत्ता यांत असतें, पण या गोष्टी स्थूल देहावरून बिनचूक ओळखतां येणें दुरापास्त आहे. त्याला चित्तशुद्धीच व्हावी लागते. आम्हांपैकीं कितीकांना आपले गांवांतील अगर प्रांतांतील सत्पुरुषांची ओळख आहे ?

यापुढें रा० काळे यांनीं महात्मे कुथूमी व सिनेटसाहेब यांचे पूर्वजन्मकथनांतील एक भाग बेझंटबाईंचे तोंडचा देऊन तो किती काल्पनिक व चमत्कारिक आहे म्हणून म्हटलें आहे. पण त्याबद्दल प्रमाण कांहींच दिलेलें नाहीं, त्यांनीं दिलेल्या उताऱ्यांत निसर्गतः अशक्य अथवा काल्पनिक अशा कोणत्या गोष्टीचा उल्लेख केला आहे ? बेझंटबाईंचें कथन खरें असेल अथवा त्यांत चूक असेल! तें खरें आहे कीं नाहीं, हें म्हणण्याचा अधिकार भूतकालज्ञानसिद्धि असलेल्या माणसांचा आहे. ज्यांना ती सिद्धि नाहीं त्यांच्याजवळ, त्या कथनांत कांहीं निसर्गविरोधी भाग आहे कीं काय हें पाहण्यापलीकडे, काय कसोटी आहे ? त्यांत तसा निसर्गविरोधक भाग कोणता आहे ? तुकाराममहाराजांनीं आपल्या अभंगांत म्हटलें आहे कीं, मी पूर्वीं उद्धव व नामदेव होतों. याविरुद्ध आमच्या-

४३७ व नारायण
दा. नों. २५११



सारख्या सिद्धिहीन माणसाजवळ प्रमाण काय ! नुसतीं अवतरणें देणें व उद्गारचिन्हांचा उपयोग करणें ह्मणजे प्रमाणें नव्हत !

तेव्हां आतां यापुढें ज्या ज्या स्वदेशी व परदेशी गृहस्थांना महात्म्यांचें दर्शन झालें, संदेश आले व अन्य चमत्कार घडले ती ती हकीकत वाचकांपुढें सादर करतों.

Society for Psychic Research चे एजंट डॉ० हॉगसन* यांचे रिपोर्टावरून असें निष्पन्न झालें म्हणून सांगण्यांत येतें कीं, अड्यार येथील सोसायटीचे देवालयांत कांहीं कृत्रिम कपाटांची, तारांची, स्प्रिंगांची, बाहुल्यांची योजना करून त्यांचे साहाय्यानें मॅडम ब्लॅव्हॅट्स्की या मॅडम कोलंब व तिचा नवरा यांचे मदतीनें लोकांना महात्म्यांचें दर्शन देत, त्यांचे संदेश आणून देत व अन्य चमत्कार घडवीत.

यासंबंधीं मद्रासचे प्रसिद्ध जज्ज सर सुब्रह्मण्य अय्यर, पोलीस इन्स्पेक्टर केशव पिल्ले, सरकारी एंजिनीयर संभय्या चेट्टी; Philosophic Inquirer चे संपादक रत्नावेलू; जुनागडचे प्रो. ˝ऊनवाला वगैरे अनेक गृहस्थांनीं सदरहु देवालय काळजीनें तपासून त्यांत त्यांना कांहीं एक संशयात्मक योजना आढळल्या नाहींत असे त्यांचे जबाब झाले आहेत. ते विस्तारभयास्तव येथें देतां येत नाहींत.

( Vide, H. P. B. and The Masters of Wisdom, pages 21-23. Report of the Result etc. pages 97-103 ).

---

**टीपः**–डॉ० हॉगसन हे प्रथम जेव्हां अड्यार येथील चमत्कारांची चौकशी करण्यास आले तेव्हां मानसशास्त्रांतील शोधांची त्यांस फार थोडी माहिती होती. पण पुढें प्रौढ वय झाल्यावर व मानसशास्त्र व स्पिरिच्युॲलिझमचे शोधांची प्रत्यक्ष माहिती मिळाल्यावर डॉक्टरमजकुरांनींच पूर्वी ज्या चमत्कारांस ते झूट म्हणाले तशाचप्रकारचे विलक्षण गोष्टींची शक्यता व सत्यता कबूल केली व मरणाचें पूर्वी त्यांनीं प्रामाणिकपणानें पुढीलप्रमाणें कबुलीजबाब दिल्याचें प्रसिद्ध झालें आहेः-मला हल्लीं ज्या गोष्टीचें ( अनुभवपूर्वक ) ज्ञान झालें आहे त्या गोष्टी मला पूर्वी कळल्या असत्या तर मीं सा. रि. सोसायटीकरितां जो रिपोर्ट लिहिला तसा लिहिला नसता." ( थिऑसफिस्ट मासिक डिसेंबर १९१२ पा. ३४८ ).

**दुसरी अत्यंत महत्वाची गोष्ट ह्मणजे महात्म्यांचें दर्शन, संदेश वगैरे चमत्कार हे फक्त अड्यारलाच झाले नसून न्यूयॉर्क, लंडन, मुंबई, सिमला, लाहोर, बनारस वगैरे पुष्कळ ठिकाणीं मॅडम ब्लॅव्हॅट्स्की यांचे सान्निध्यांत व त्या नसतांना; त्यांचे हयातींत व त्यांचे मरणानंतर; मॅडम कोलंब व त्यांचा नवरा ही ब्लॅव्हॅट्स्की बाईजवळ नोकर असण्यापूर्वीं व नंतर; दिवसाढवळ्यां स्वदेशी व परदेशी गृहस्थांचे समोर; घडले आहेत.**

याविषयीं कर्नल ऑल्कॉट लिहितातः—

" I do not understand our sceptic to mean that at our Headquarters we have mechanical appliances or magic lanterns by aid of which we perform phenomena. This would be too absurd because these have occurred not only in all parts of our present two bunglows and in the open air all round but at the Khandalla Station of the Ghats, where we were only stopping for a day, at Simla, at Benares, Ceylon-etc. where we were living in other people's houses-to say nothing of Europe and America and we certainly could not drag our machinery and our apparatus about with us. "

( Hints on Esoteric Theosophy No. 1 page 134. )

सिमला मुक्कामीं मि. ह्यूम यांचे बंगल्यावर, मेजवानीचे प्रसंगीं गव्हर्नर-जनरलच्या कौन्सिलचे कांहीं सभासद हजर असतां, मिसेस ह्यूम यांचे विनंती-वरून त्यांचा कित्येक वर्षांपासून हरवलेला Brooch ( एक दागिना ) ब्लॅव्हॅट्स्कीबाईनीं आपल्या सिद्धीचे सामर्थ्यानें बंगल्याचे बागेंत एका पुष्प-वाटिकेंत आणविला व या चमत्काराचे खरेपणाबद्दल तेथें हजर असलेल्या गृह-स्थांनीं आपल्या सह्यांनिशीं ती हकीकत प्रसिद्ध केली. या वेळीं कोलंबबाईही नव्हत्या व ह्यूमसाहेबांसारख्या अनोळखी गृहस्थांचे घरीं तारा व स्प्रिंगजही बसविण्याची व्यवस्था शक्य नव्हती. ( Vide The Occult World, by Sinnett, page 70. )

कर्नल ऑल्कॉट यांना आपल्या गुरूंचें दर्शन प्रथम न्यूयॉर्कमध्यें झालें. त्याही वेळीं कोलंबबाई तारा ओढण्यास अथवा स्प्रिंग दाबण्यास नव्हत्या.

त्या वेळीं त्या आपली इंजिप्तमध्यें खाणावळ चालवीत होत्या. हें दर्शन ह्मणजे मायेचा खेळ नाहींना, अशी कल्पना ऑल्कॉटसाहेबांचे मनांत आली. त्याबरोबर गुरूंनीं स्मित वदन करून आपला डोक्यावरचा रेशमी पिंवळा फेटा त्यांना देऊन ते चालते झाले. हा फेटा अद्याप अड्यारला आहे. या भेटींत दोघांचें भाषण तास अर्धातास चाललें होतें.*

---

* या दर्शनाविषयीं कर्नल ऑल्कॉट पुढील बहारीचें वर्णन लिहितात:—

'Our evening's work on Isis was finished. I had bade good night to H. P. B. and retired to my own room, closed the door as usual; sat me down to read and smoke: and was soon absorbed in my book......I was quietly reading, with all my attention centered in my book. Nothing in the evening's incidents had prepared me for seeing an adept in his astral body; I had not wished for it, or tried to conjure it up in my fancy, nor in the least expected it. All at once, as I read with my shoulder, a little turned from the door, there came a gleam of something white in the right hand corner of my right eye. I turned my head, dropped my book in astonishment and saw towering above me in his great stature an Oriental, clad in white garments, and wearing a head-cloth or turban of amber-striped fabric, hand-embroidered, in yellow floss--silk. Long raven hair hung from under his turban to the shoulders; his black beard, parted vertically on the chin in the Rajput fashion, was twisted up at the ends and carried over the ears. His eyes were alive with soul-fire; eyes which were at once benignant and piercing in glance; the eyes of a mentor and a judge, but softened by the love of a father who gazes on a son needing counsel and guidance. He was so grand a man, so imbued with the majesty of moral strength, so luminously spiritual, so evidently above average humanity, that I felt abashed in his presence and bowed my head and bent my knee as one does before a god or a godlike personage. A hand was lightly laid on my head, a sweet though strong voice bade me be seated, and when I raised my eyes, the Presence was seated in the other chair beyond the table. He told me he had come at the crisis when I needed him; that my

( पुढील पृष्ठ पहा. )

यानंतर कित्येक वेळां यांचेंच दर्शन हिंदुस्थानांत असतां अनेक ठिकाणीं ऑल्कॉटसाहेबांस ह्याच स्वरूपांत स्थूल देहानें झालें.

( पहा Hints on Esoteric Theosophy, page 111 ). कर्नल ऑल्कॉट यांना अशा निदान १०।१२ सत्पुरुषांशीं समागम घडला. कारण, त्यांच्या हातून कार्य तशाच मोलाचें व्हावयाचें होतें व झालेंही.

---

( पृष्ठ २० वरून पुढें चालू. )

actions had brought me to this point; that it lay with me alone whether he and I should meet often in this life as co-workers for the good of mankind, that a great work was to be done for humanity and I had the right to share in it if I wished; that a mysterious tie not now to be explained to me had drawn my colleague and myself together, a tie which could not be broken however strained it might be at times. He told me things about H. P. B. that I may not repeat, as well as things about myself that do not concern third parties. How long he was there I cannot tell. It might have been a half-hour or an hour. It seemed but a minute, so little did I take notice of the flight of time. At last he rose, I wondering at his great height and observing the sort of splendour in his countenance-not an external shining, but the soft gleam, as it were, of an inner light-that of the spirit. Suddenly the thought came into my mind "what if this be but hallucination? What if H. P. B. has cast a hypnotic glamour over me? I wish I had some tangible object to prove to me that he has really been here; something that I might handle after he is gone!" The Master smiled kindly as if reading my thought, untwisted the *feta* from his head, benignantly saluted me in farewell and was gone: his chair was empty; I was alone with my emotion! Not quite alone, though, for on the table lay the embroidered head-cloth, a tangible and enduring proof that I had not been 'overlooked' or psychically befooled, but had been face to face with one of the Elder Brothers of Humanity, one of the Masters of our dull pupil-race. To run and beat at H. P. B's

( पुढील पृष्ठ पहा. )

**टी. ब्राऊन** या गृहस्थांना लाहोर मुक्कामीं महात्मा कुथूमी यांचें दर्शन दिवसा झालें. ते लिहितात ( या वेळीं मॅ. ब्लॅव्हॅट्स्की तेथें नव्हत्या. ):-

'Lahore has a special interest because there we saw in his own physical body, Mahatma Koot Hoomi himself. On the afternoon of the 19th November, I saw the Master in broad daylight and recognised him ( My experiences in India, and 'H. P. B. and the Masters of Wisdom,' page 13 ).

---

( पृष्ठ २१ वरून पुढें चालू. )

door, and tell her my experience was the first natural impulse, and she was glad to hear my story as I was to tell it. I returned to my room to think and the gray morning found me still thinking out and resolving. Out of those thoughts and those resolves developed all my subsequent theosophical activities, and that loyalty to the Masters behind our movement which the rudest shocks and cruelest disillusionings have never shaken.'

( Old Diary Leaves, pages 379-381. )

**अर्थः**—" आयसिस " ग्रंथाचें सायंकाळचें लिहिण्याचें काम आटपलें. मीं ब्लॅव्हॅट्स्की यांचा निरोप घेतला व आपल्या खोलींत आलों. नेहमींप्रमाणें दार बंद केलें व खुर्चीवर बसून वाचूं लागलों व धूम्रपानही करीत होतों. लवकरच मी पुस्तकांत मग्न झालों. ... ... ... ... मी स्वस्थपणें वाचीत पडलों होतों. पुस्तकांत माझें मन अगदीं गढून गेलें होतें. एखाद्या महात्म्याचें सूक्ष्मदेहांत दर्शन होईल, अशी माझे मनाची वृत्ति होण्यास सायंकाळीं कांहींच घडलें नव्हतें. दर्शन व्हावें म्हणून त्या दिवशीं माझे मनांत इच्छाही उत्पन्न झाली नव्हती, किंवा तें दर्शन होईल अशी माझ्या मनांत कल्पना अगर अपेक्षाही नव्हती, आंत येण्याच्या दाराकडून माझी पाठ किंचित् वळलेली होती. एकदम माझ्या उजव्या डोळ्याच्या उजव्या कोंपऱ्याकडून प्रकाश आलासें वाटलें. म्हणून मीं तोंड फिरविलें तों आश्चर्यानें चकित होऊन माझे हातांतून पुस्तक पडलें; व पाहतों तों पौर्वात्य देशांतील राहणारे असे एक उंच व भव्य पुरुष दिसले. त्यांनीं शुभ्र वस्त्रें परिधान केलीं होतीं. त्यांचे डोक्यावर फेटा होता. त्यावर पिवळसर रंगाचे पट्टे असून आंत पिवळ्या रेशमाचे वेलबुट्टीचें काम होतें. त्यांचे काळेभोर केश फेट्याचे खालून खांद्यावर पडले होते. त्यांची दाढी रजपूत तऱ्हेवर हनुवटीवर उभी दुभागून टोंकाशीं पिळून कानावर चढविलेली.

( पुढील पृष्ठ पहा. )

असाच चमत्कार व दर्शन बनारसचे प्रसिद्ध प्रो. **थीबो** व अयोध्येचे ज्युडिशिअल कमिशनर मि. **रॉस स्कॉट** वगैरे अनेक गृहस्थांसमक्ष झालें.

( पहा Old Diary Leaves vol. 2. page 132 व Hints on Esoteric Theosophy No. 1, pages 205-206 ).

---

( पृष्ठ २२ वरून पुढें चालू. )

होती. त्यांचे नेत्रांत आत्मतेज झळकत होतें. त्यांची दृष्टि तीक्ष्ण असून पुनः पूर्ण करुणामय होती. त्या नेत्रांत राजाचें क्षात्रतेज असून पितृवात्सल्य पूर्ण भरलें होतें. त्यांची ती भव्य मूर्ति, दैवी व नैतिक संपत्तीनें इतकी पूर्ण देदीप्यमान व साधारण मानवदेहांहून इतकी तेजस्वी अशी पाहून मी माझे ठिकाणीं ओशाळलों व डोकें लववून जसे ईश्वरापुढें अगर देवमाणसासमोर गुडघे टेंकावे तसे गुडघे टेंकले. त्यांनीं माझे डोक्यावर आपला हस्त अलगद ठेवला व गोड पण गंभीर अशा आवाजानें मला ' बैस ' ह्मणून सांगितलें. जेव्हां मीं आपले डोळे वर केले तेव्हां ते मेजापलीकडील दुसऱ्या खुर्चीवर बसले होते. ते ह्मणाले कीं, " त्यांचे दर्शनाची मला जरूर होती, अशा प्रसंगानेंच ते आले आहेत. तो प्रसंग माझे पूर्व कर्मानेंच घडून आला आहे. मानवकल्याणाचे कार्यांत त्यांची व माझी गांठ वारंवार पडावी कीं नाहीं, हें माझे पुढील वर्तनावर अवलंबून आहे. मानवांकरितां एक मोठें कार्य करावयाचें आहे व माझी इच्छा असल्यास त्या कार्यास हातभार लावण्याचें माझे कर्मांत योग आहे. या संसारयात्रेंत त्यांचा व माझा संबंध हा कांहीं एका गुप्त कर्मविपाकानें जडला आहे. तो कोणता व कसा, हें सध्यां सांगण्याचें कारण नाहीं. हा संबंध जरी कित्येक वेळां शिथिल झाला तरी तो अजीच तुटणें शक्य नाहीं. " त्यांनीं मला मॅडम ब्लॅव्हॅट्स्की व माझ्यासंबंधीं कांहीं गोष्टी सांगितल्या. त्या येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. त्यांचा तिऱ्हाइताशीं संबंध नाहीं. ते तेथें किती वेळ होते हें मला सांगतां येत नाहीं. कदाचित् अर्धा तास असतील, कदाचित् तासभर असतील. तो काल मुहूर्तमात्र भासला. कालाच्या गतीकडे त्या वेळीं माझें लक्ष्य इतकें थोडें होतें. सरतेशेवटीं ते उठले व मी त्यांचे मुद्रेवरील तेज पहातच राहिलों. तें त्यांचें तेज बाह्य शारीरिक तेज नसून अंतःस्थ मधुर अशी आत्मप्रभा होती. एकदम माझे मनांत विचार आला कीं, 'हा सर्व भ्रम तर नाहींना! मजवर मॅडम

( पुढील पृष्ठ पहा. )

## लेखांक ५.

# महात्म्यांचें हिंदी गृहस्थांस दर्शन व संदेश.

या बाबतींत विशेष अधिकाराचे पुरुष अमदाबादचे रा. दामोदर कृष्ण मावळणकर होत. हे थिऑसफिस्ट होण्यापूर्वी कित्येक वर्षें आधीं एकदां आजारी असतां यांना त्यांच्या गुरूंचें दर्शन झालें. नंतर कांहीं वेळानें मॅ. ब्लॅव्हॅट्स्की यांशीं त्यांची ओळख झाली व ते थिऑसफिकल सोसायटीचे सभासद झाले. बाईच्या सान्निध्यांत असतां त्यांनीं बाईजवळ दोन महात्म्यांच्या असलेल्या तसबिरी पाहिल्या व एका तसबिरीवरून ज्यांचें आपणास लहान वयांत

---

( पृष्ठ २३ वरून समाप्त. )

ब्लॅव्हॅट्स्की बाईनीं कृत्रिम मोहनी तर घातली नाहीं ना ? हे पुरुष खरोखरच येथें प्रत्यक्ष आले होते असें सिद्ध करण्यास मजजवळ जर कांहीं प्रत्यक्ष स्पृश्य असा पदार्थ राहील तर बरें होईल. ' गुरुदेवांनीं लागलीच स्मित केलें. जणों त्यांनीं माझे मनांतला विचार ओळखला. त्यांनीं आपल्या डोक्यावरचा फेटा काढला व मजपुढें टाकला व परमकारुणिक मुद्रेनें मला आशीर्वाद देऊन माझा निरोप घेतला व निघून गेले. त्यांची खुर्ची मला रिकामी दिसली व मी तेथें एकटाच विचारमग्न असा राहिलों. मी अगदींच एकटा नव्हतों. कारण मेजावर त्यांचा नकशीदार फेटा पडलेला होता. मी फसलों नाहीं किंवा मला भ्रांति झाली नाहीं, तर खरोखरच आम्हां मूढ मानवांचे गुरुस्थानीं असलेल्या सत्पुरुषांपैकीं एकाचें मला प्रत्यक्ष दर्शन झालें, याचा प्रत्यक्ष दाखला मजसमोर पडला होता. एकदम धांवत जाऊन मॅडम ब्लॅव्हॅट्स्की बाईंना दार ठोठावून उठवावें व माझा अनुभव सांगावा हा विचार एकदम माझ्या साहजिकपणें मनांत आला व माझी हकीकत सांगण्यांत मला जितका आनंद वाटला तितका त्यांना तो श्रवण करण्यांत वाटला. मी फिरून परत आलों व आपल्या खोलींत विचार करीत पडलों. अरुणोदयपावेतों मी तसाच विचारमग्न पडलों होतों. त्या रात्रींचे विचारांमधून व केलेल्या निश्चयांमधून माझी थिऑसफिकल सोसायटीचे कार्याबद्दलची कामगिरी निष्पन्न झाली व कितीही संकटें अगर कठीण प्रसंग आले. तरी न डळमळणारा आत्मविश्वास व गुरुदेव विषयींची दृढ श्रद्धा माझे हृदयांत बाणली.

दर्शन झालें तेच हे, अशी ओळख पटली. यामुळें यांचा ब्लॅव्हॅट्स्कीबाईंचे अधिकारित्वाबद्दल व सोसायटीचे कार्याबद्दल दृढ विश्वास जडला. त्यांनीं आपल्या वडिलोपार्जित जिनगीबद्दल सोडचिठ्ठी लिहून दिली व सोसायटीचे कार्यास आपलें तन व मन अर्पिलें. यांची योगांत चांगली गति होऊन ते रोज सूक्ष्मदेहानें गुरूंच्या आश्रमांत व अन्य ठिकाणीं संचार करून कार्य करूं लागले यांना महात्म्यांचीं स्थूलदेहांतसुद्धां कितीदां तरी दर्शनें झालीं व ते स्थूलदेहानें एकदां गुरूंच्या हिमालयांतील आश्रमांत दोन दिवस जाऊनही राहिले. लाहोर येथील दर्शनाबद्दल व वरील हिमालयांतील मुलाखतीबद्दल ते लिहितातः--

'There I was visited by him ( Master K. H. ) in body, on three nights consecutively for about three hours every time, while I myself retained full consciousness and in one case even went to meet Him outside the house-Him whom I saw in person at Lahore, was the same I had seen in astral form at the Head-quarters of the Theosophical Society and the same again whom I, in visions and trances had seen at His house thousands of miles off.'

'The fact is that I had the good fortune of being sent for and permitted to visit a sacred ashram where I remained *for a few days* in the blessed company *of several of the Mahatmas* of the Himavat and their disciples. There I met not only my beloved Gurudeo and Col. Olcott's Master but several others of the Fraternity, including one of the highest...............Suffice it that the place I was permitted to visit, *is in the Himalayas,* not in any fanciful summer land and that I saw him *in my own* Sthula Sharir ( स्थूल शरीर ) and found my Master identical with the form I had seen in the earlier days of my chelaship ( Five years of Theosophy, page 288 ).

**अर्थः**–' त्या ठिकाणीं ' मला महात्मा कुथूमी यांचा स्थूलदेहाने दर्शनयोग घडला. हा योग सतत तीन रात्रीं प्रत्येक दिवशीं तीन तीन तास घडून आला. या तिन्ही प्रसंगीं मी पूर्णपणें जागृतावस्थेंत होतों व एके प्रसंगीं तर त्यांना निरोप देण्याकरितां मी घराबाहेर गेलों होतों. ज्यांचें मला लाहोर मुक्कामीं दर्शन घडलें तेच मला थिऑसॉफिकल सोसायटीचे आद्यपीठस्थानीं

सूक्ष्मदेहानें दिसले होते व तेच मला स्वप्नांत व ध्यानांतही हजारों कोसांवर लांब असलेल्या आपल्या आश्रमांत असलेले असे दिसले आहेत..........

( रा. मावळणकर हिमालयांत स्वतः स्थूलदेहानें गेल्याबद्दल लिहितात. )

वास्तविक स्थिति अशी होती कीं, माझ्या सुदैवानें सद्गुरूंच्या दिव्य आश्रमाचें दर्शन घेण्याची मला त्यांनीं अनुज्ञा देऊन तिकडे येण्याबद्दल मला निरोप पाठविला होता. त्या पवित्र स्थळीं मी हिमालयस्थ अशा कित्येक महात्म्यांचे व त्यांचे सच्छिष्यांचे समागमांत थोडे दिवस राहिलों. त्या ठिकाणीं मला माझ्या व कर्नल ऑल्कॉट यांच्या गुरुदेवांचेच नव्हे तर त्यांच्या दिव्य संघांतील इतरही ऋषींचें दर्शन घडलें. त्यांपैकीं एक तर परमगुरु या अधिकाराचे आहेत...... तात्पर्य ज्या ठिकाणीं मी त्यांचे अनुज्ञेनें गेलों होतों तें एखादें काल्पनिक सृष्टींतील भ्रम नसून हिमालयांतील एक प्रत्यक्ष स्थळ आहे; आणि त्या ठिकाणीं मला माझ्या सद्गुरूंचें दर्शन मी स्थूलशरीरांत ( पूर्ण जागृत ) असतां लहानपणीं मीं जें त्यांचें स्वरूप पाहिलें होतें त्याच स्वरूपांत घडलें. "

दुसरे गृहस्थ मद्रासचे प्रसिद्ध विद्वान् पंडित **टी. सुब्बाराव**, बी. ए. बी. एल., हे होत. हे नीलगिरीमध्यें एका सत्पुरुषाचें दर्शन घेऊन आले होते व ब्लॅव्हॅट्स्कीबाई सांगत असलेल्या महात्म्यांचेंही दर्शन यांना कित्येक वेळां जागृतावस्थेंत व स्वप्नांत होत असे. हे उत्तम योगी होते.

तिसरे स्वदेशी गृहस्थ डिस्ट्रिक्ट रेजिस्ट्रार **एस. रामस्वामीयर** हे होत. यांना महात्मा मोर्य यांचें दर्शन दिवसां नऊ वाजतां सिक्किमचे ( नेपाळांतील ) जंगलांत झालें. त्या प्रसंगाचें हृदयंगम वर्णन त्यांनीं Five years of Theosophy, pages 284, 285 या पानांवर बहारीनें केलें आहे, पण तें विस्तारभयास्तव देत नाहीं. तें वाचकांनीं स्वतः वाचण्याविषयीं सप्रेम व आग्रहाची विज्ञप्ति करितों.

चवथे गृहस्थ बनारसचे **पंडित भवानीशंकर** हे होत. ते ह्मणतातः—

( 2 ) I have seen the same Mahatma( Master M. ) viz. Madame Blavatsky's Master, several times in his double, during my travels in the North. Not only have I seen Madame Blavatsky's Master in His double, but my venerated Gurudev K. H. I have also seen the latter viz. my Master, *in his physical body* and

*recognised him* ( Report of Result etc., pages 79, 80 & H. P. B. and the Masters of Wisdom page 15. )

**अर्थः**–' उत्तर हिंदुस्थानांत प्रवास करीत असतां त्याच महात्म्यांचें ( महात्मा राजा मौर्य ) म्हणजे मॅडम ब्लॅव्हॅट्स्की यांच्या गुरूंचें मला कित्येक वेळां त्यांचे सूक्ष्मदेहांत दर्शन घडलें आहे. सूक्ष्मदेहानें त्यांचेंच नव्हे तर माझेही सद्गुरु महात्मा कुथूमी यांचें मला दर्शन घडलें आहे. महात्मा कुथूमी यांना मीं त्यांचे स्थूलदेहांतही पाहिलें आहे व मी त्यांना ओळखूं शकतों. '

यांनींच आपल्या गुरुदेवाकडून सिनेटसाहेबांकरितां आलेलें पत्र त्यांचे स्वाधीन केलें. या वेळीं मॅ. ब्लॅव्हॅट्स्की या अलाहाबादेस नव्हत्या. हे गृहस्थ अजून जिवंत आहेत, व प्रस्तुत लेखकाचे ओळखीचे आहेत. त्यांचेजवळ समक्ष चौकशी करून इच्छा असेल त्यांनीं आपली खात्री करून घ्यावी.

सन १८८४ सालीं **कर्नल ऑल्कॉट व ब्लॅव्हॅट्स्की हीं दोघेंही युरोपांत असतां** जर्मनीचे रहिवासी डॉ. हार्टमन यांना नेहमींचे हस्ताक्षरांत महात्मा कुथूमी यांचें पत्र मिळालें. ( पहा Theosophist, February 1908, page 391. )

सन १८८४ एप्रिलमध्यें **कर्नल ऑल्कॉट** व **मोहनीमोहन चतरजी** हेच **दोन गृहस्थ** रेल्वेमधून लंडनला जात असतां गाडींत महात्म्यांचें(कुथूमी) पत्र पडलें. ( पहा Old Diary Leaves Vol. 3, page 91 ).

**मॅडम ब्लॅव्हॅट्स्की या लंडनमध्यें असतां** कर्नल ऑल्कॉट व जर्मनीचे विद्वान् गृहस्थ डॉ. हूबे श्लीडन हेच दोघे **जर्मनीमध्यें प्रवास करीत होते**. रेल्वे गाडींत श्लीडनसाहेबांस पत्र मिळालें. ( Old Diary Leaves, Vol . 3, page 167 ).

**या सर्व पत्रांतील हस्ताक्षरें ओळखीचीं** व नेहमींचीं आहेत; व **या तिन्ही प्रसंगीं ब्लॅव्हॅट्स्की, कोलंबबाई, तारा, स्प्रिगा वगैरे कोणी नव्हतें.**

अशीं दर्शनाचीं व चमत्कारांचीं उदाहरणें शेंकडों देतां येतील. मासल्याकरितां ह्मणून कांहीं दिलीं आहेत. **तेव्हां महात्म्यांचीं दर्शनें व संदेश हे परदेशी व स्वदेशी दोन्ही माणसांना, व ब्लॅव्हॅट्स्की व कोलंबबाई नसतांना झालीं आहेत हें उघड आहे.**

## लेखांक ५.

# बेझंटबाई व लेडबीटर. (अ)

वरील मथळ्याचा लेखांक ( रा. काळे यांचा ) वास्तविक चवथा असून चुकीनें पांचवा ह्मणून छापला गेला आहे. यांत रा. काळे यांनीं दोन मुद्यांची चर्चा केली आहे. एक बेझंटबाई व लेडबीटर यांनीं ' कालपटलच्छेद' (Rents in the veil of time) या नांवानें कृष्णमूर्ति वगैरे गृहस्थांचे पूर्वजन्मकथनपर जे लेख दिव्यदृष्टीचे साहाय्यानें शोध करून लिहिले आहेत तो; व दुसरा मुद्दा वरील दोघां व्यक्तींचे नीतिविषयक मतांबद्दल व शिकवणुकीबद्दलचा आहे.

हिंदुस्थानचें राष्ट्रीय कर्म सांगतांना बाईंचे लेखांतील एक उतारा देऊन, हिंदुस्थानांतील लोकांनीं सध्यांची अनिष्ट स्थिति सुधारण्याचा प्रयत्न न करतां ' आलिया भोगासी असावें सादर ' असें म्हणून स्वस्थ बसावें, असा बाईंनीं उपदेश केल्याबद्दल रा. काळे यांनीं त्यांचे अवतरणाचा चुकीचा अर्थ करून म्हटलें होतें, पण ती चूक त्यांनीं प्रस्तुत लेखकाजवळ खाजगी भेटींत सरळपणानें कबूल करून ती ता. १९ जूनच्या मुमुक्षूचे अंकांत छापूनही प्रसिद्ध केली. याबद्दल त्यांचे सरळपणाबद्दल मी रा. काळे यांचें अभिनंदन करतों, तेव्हां याबद्दल कांहीं लिहिणें राहिलें नाहीं.

आतां हिंदुस्थानास आलेल्या सद्यःकालीन अनिष्ट स्थितीचें कारण व ती घालविण्याचे उपाय, या बाबतींत बाईंचा व रा. काळे व राजकीय दृष्टीनेंच केवळ विचार करणारे इतर गृहस्थ यांचा मतभेद असेल. बाई ह्मणतात जोंपर्यंत आह्मांला आमच्या राष्ट्रांत आमच्यापैकींच कांहीं लोक अस्पृश्य वाटतात व त्यांच्याविषयींचे आमच्या कर्तव्याची जागृति आह्मांमध्यें उत्पन्न होत नाहीं, तोंपर्यंत स्वातंत्र्यदेवीचे प्रसादास आह्मी आपणास अधिकारी करूं शकणार नाहीं. रा. काळे ह्मणतात, ' आम्हांला ही स्थिति परस्परांतील दुहीमुळें ह्मणजे राष्ट्रीय ऐक्याच्या अभावामुळें आली हें सर्वस्वी सिद्ध आहे. ' होय. पण ही परस्परांतील

दुही व राष्ट्रीय ऐक्याचा अभाव या वृत्ति आमच्यांत कशा उत्पन्न झाल्या याचा रा. काळे यांनीं मानसशास्त्रदृष्टीनें कधीं विचार केला आहे काय ? प्रत्येक उच्च वर्णाच्या लोकांत आपल्या कर्तव्यापेक्षां व जबाबदारीपेक्षां, आपले अधिकार व आपलें सुख याच वृत्तींचा जास्त पगडा बसतो व दुसरे वर्ण हे आपल्याकरितां उत्पन्न केलेले आहेत असें वाटून कस्पटासमान वाटतात व त्यांना ते कमी अधिक अस्पृश्य करूं लागतात तेव्हां परस्परांत दुही व राष्ट्रीय ऐक्याचा अभाव हीं उत्पन्न होतात, हें रा. काळे यांस शक्य वाटत नाहीं काय ? हा विचार जास्त सखोल नाहीं काय ? असो, सध्यांच्या गडबडीच्या व धडपडीच्या त्रस्त काळांत या बाबतींत मतभेद असणें साहजिक आहे. सध्यांच्या काळांत नेमस्त व राष्ट्रीय पक्षांतील पुढाऱ्यांमध्यें—दोघेही एकाच देशांतील, एकच हिताहित असलेले असून सुद्धां तीक्ष्ण मतभेद आहेत व त्यावरून एकमेक एकमेकांचे हेतूंबद्दल सुद्धां साशंक होतात. तर मग विदेशी बाईकडून सद्यःस्थितीचें निदान व त्यावर उपाय सुचविले गेल्यास त्याबद्दल मतभेद असल्यास अरुचि व संशय उत्पन्न होणें साहजिक आहे. सध्यां यापेक्षां जास्त लिहिणें शक्य नाहीं. कोणाचें निदान खरें व कोणाचे उपाय युक्त, हें कालशक्ति ठरवील.

रा. काळे लिहितात, ' थिऑसफिकल सोसायटीचा राजकीय गोष्टींत पडावयाचें नाहीं असा बाणा आहे. त्यांनीं हा खटाटोप कशासाठीं करावा ? त्यांना राष्ट्रीय कर्माशीं काय करावयाचें होतें ? ' बरोबर आहे. थिऑसफिकल सोसायटीला या गोष्टीशीं कांहीं कर्तव्य नाहीं, पण बेझंटबाई ह्मणजे थिऑसफिकल सोसायटी नव्हेत. थिऑसफिकल सोसायटीच्या अध्यक्ष व सभासद ह्मणून एक व्यक्ति हे त्यांचे दोन संबंध निरनिराळे आहेत, हें कोणालाही स्पष्ट दिसेल. कोणाचे व्याख्यानांतील अगर लेखमालेंतील मतांबद्दल सोसायटी अगर दुसरा कोणताही सभासद जबाबदार नाहीं हें सोसायटीचें आद्यतत्व आहे. सर्वजण अभ्यास करितात. मतें व वर्तन ज्याचें तो ठरवितो. एकाच मताचीं माणसें एके ठिकाणीं कार्य करितात. मतभेद असलेलीं माणसें आपलें कार्य निराळें करीत राहून दुसऱ्यांचे मतांबद्दल व कार्याबद्दल अडथळा न करितां सहानुभूति ठेवितात. बाईनीं बनारसला सेंट्रल हिंदु कॉलेज काढलें तर ऑल्कॉट यांनीं अस्पृश्य जातींचे व बौद्धधर्मीयांचे शिक्षणाकरितां शाळा व कॉलेजें काढिलीं. हे उद्योग, ज्यांचे त्यांचे वैयक्तिक होत. राजकीय विचार व चळवळ हीं कोणत्याही संबंधांत सभासदाला वैयक्तिक संबंधांत निषिद्ध नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतील

प्रसिद्ध देशभक्त गांधी व पोलक हे थिऑसाफिस्ट आहेत व राजकीय कार्य हें त्यांचें मुख्य कार्यक्षेत्र आहे.

दुसरी एक गोष्ट फार मौजेची आहे. आमच्या इकडील सध्यांचे साधुसंत आपल्या अध्यात्मज्ञानाचा उपयोग करून राजकीय, सामाजिक वगैरे बाबतींत मन घालीत नाहींत, तर त्यांना आम्ही विचारतों कीं आपल्या देशाची इतकी निकृष्ट स्थिति झाली असतां तुमच्याच्यानें स्वस्थ कसें बसवतें ? तुमच्या उच्च ज्ञानाचा आह्मांला व आपल्या देशाला उपयोग काय ? गिरिकंदरांतील ऋषी अप्पलपोटेपणानें आपल्या मुक्तीची जी खटपट करीत बसले आहेत ते बाहेर येऊन आपला काय तो प्रकाश कां दाखवीत नाहींत ? तर उलट बेझंटबाईसारखे कर्मयोगी या उद्योगांत पडतात व अध्यात्मज्ञानाचा उपयोग राजकीय व सामाजिक प्रश्नांचा विचार करितांना कसा करतां येईल, हें दाखवितात. तेव्हां आम्ही उलट खाऊन त्यांच्याशीं आमचा मतभेद होतो ह्मणून पूर्वीचीं विधानें पार विसरून जाऊन पुनः विचारतों कीं तुम्हांला हा उद्योग कशाला ! तुम्हीं ध्यान करावयाचें, नाहीं तर टाळ कुटावयाचे, ते या उद्योगांत कशाला पडतां ? तुकाराममहाराज, नामदेव, एकनाथ कधीं असल्या फंदांत नाहीं पडले श्रीकृष्ण, वसिष्ठ, श्रीरामदास, ब्रह्मेंद्रस्वामी या आत्मविद्वांनीं राजकीय व सामाजिक सूत्रें आपल्या हातांनीं चालविलीं हें आह्मी अजीबात विसरतों. साधुसंत हे निरनिराळ्या अधिकारांचे व निरनिराळें अवतारकार्य असलेले असतात हें आह्मांस अद्याप उमजलेलें नाहीं, हें या शंकांचें वर्म आहे.

पूर्वजन्मकथनासंबंधीं रा. काळे लिहितात, 'ज्या लोकांना कृष्णमूर्तीचें तीस पूर्वजन्म कळले व पुढें त्यांच्यांत आवेश होणार आहे हें कळलें, त्याच माण ! सांना लीडरमध्यें कोणीं पत्र छापलें किंवा तीस दिवसांनीं हायकोर्टाचा निकाल आपल्या विरुद्ध होणार हें कां कळूं नये ? जर कळलें असलें तर असें कळून देखील मग त्यांनीं केवढा अट्टाहास केला म्हणावें लागतें बरें ! '

आह्मी रा. काळ्यांना असें विचारतों कीं, त्यांना हायकोर्टाचा निकाल कळला तरी ज्याला ते अट्टाहास ह्मणतात त्या उद्योगांत फरक कसा होईल व कां व्हावा ? 'फलाची आसक्ति सोडून कर्म कर' हा आम्हां हिंदूंच्याच श्रीकृष्ण जगद्गुरूंचा उपदेश आहेना ? ते ह्मणतात, 'सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः । ' ही शिकवणूक कोणाची ? त्याच कृष्णांनीं भारतीय युद्ध होणार हें

माहीत असतांना व त्यांचा तर अवतारसुद्धां तेवढ्याकरितां असतां दुर्योधनाच्या सभेंत जाऊन शिष्टाईरूपीं अट्टाहास करण्याची त्यांनीं स्वतः कां खटपट केली ! श्रीरामचंद्राची सुद्धां तीच स्थिति ! ! रावणाशीं युद्ध करून त्याला त्याचे सर्व राक्षसगणांसह मारण्याकरितां तर सर्व योजना, तरी पण अगंदशिष्टाईचा अट्टाहास झालाच ! कर्मयोगाचें रहस्यच हें कीं, आपण आपलें कर्तव्य निरपेक्ष-बुद्धीनें करीत रहावें व फलसंयोग हा ईशयोजनेवर ठेवून द्यावा.

पूर्वजन्मकथनावर टीका करतांना रा. काळे यांनीं आपल्या लेखांक ३ चे दुसऱ्या रकान्यांत एक अतिशय कुत्सित व अश्लील असें विधान केलें आहे. ते लिहितात, 'त्यांनीं आपल्या दिव्यदृष्टीनें असें ठरविलें कीं, जे. कृष्णमूर्ति हा पूर्वजन्मीं लेडबीटरची बायको होता म्हणून या जन्मींही त्यांस लेडबीटरशीं संबद्ध असलें पाहिजे. काय ही अनार्थावह विचारपरंपरा ! ! ! ' आह्मीही कबूल करतों कीं, ही विचारपरंपरा खरोखरच फार अनर्थावह आहे. पण ही विचार-परंपरा रा. काळे यांना बेझंटबाई अगर लेडबीटर यांच्या कोणत्या लेखांत अगर भाषणांत अगर जबाबांत सांपडली ! आम्हांला माहीत आहे कीं, फिर्यादअर्जाचें कलम ६ मध्यें जी. नारायण यानें लिहिलें कीं,

'But for the first time, the defendant refused to adopt any such course ( separating the boys from Mr. Leadbeater ) and alleged that the boys and Mr. Leadbeater had been together for several lives past. )

व बेझंटबाईनीं आपल्या लेखी जबाबाच्या सातव्या कलमांत **या कारणास्तव** लेडबीटरपासून मुलांना दूर करण्याचें नाकारल्याबद्दल जबाब दिला आहे. वरील नारायण्याचे विधानांत फक्त अनेक पूर्वजन्मांतरांतील संबंध असा साधारण उल्लेख आहे. यांत कोणताही अश्लील भाग नाहीं. अनेक पूर्वजन्मांतरीं जडलेल्या पितापुत्र, मातापुत्र, बंधुभगिनी, नवराबायको, स्नेही वगैरे निरनिराळ्या नात्याचे निकटसंबंधामुळें विशिष्ट व्यक्तींत प्रेम वसत आहे व तें दूर रहाणें शक्य नाहीं हें म्हणणें निराळें. त्यांत कोणतीही अश्लील ध्वनि नाहीं. पूर्वजन्मावर विश्वास असणाऱ्या प्रत्येक हिंदूला हें कबूल होईल.

मातापितृसहस्राणि, पुत्रदारशतानि च ।
संसारेष्वनुभूतानि याता यास्यंति यांति च ॥

'संसारांमध्यें (अनेक जन्मांतरीं) हजारों माता व पिते; शेंकडों मुलगे व कलत्रें; हीं ( संबंधीं होऊन अनुभविलेलीं) पूर्वी येऊन गेलीं, पुढें येतील व सध्यां आलीं आहेत' हें प्रत्येक हिंदु प्रातःस्मरणांतच ह्मणत आला आहे. पण त्या विशिष्ट व्यक्ति पूर्वजन्मीं नवराबायको होत्या ह्मणून त्या याही जन्मीं संबद्ध असल्या पाहिजेत, असें विधान करून त्यांत अश्लील असा संबंध ध्वनित करावयाचा हें सभ्याचारास अनुसरून नाहीं. तेव्हां या विधानास एक तर रा. काळे यांनीं बेझंटबाई अगर लेडबीटर यांच्या जबाबाचा, लेखाचा अगर भाषणांचा आधार दाखवावा, नाहीं तर हें विधान चुकीचें म्हणून सपशेल सरळपणानें कबूल करावें, अशी त्यांस विज्ञप्ति आहे.

---

## लेखांक ६

# बेझंटबाई व लेडबीटर. ( ब )

रा. काळे यांच्या लेखांक ५ मधील दुसरा मुद्दा ' लेडबीटर व बेझंटबाई यांचीं नीतिविषयक मतें व शिकवणूक ' याबद्दलचा आहे. त्याचा या लेखांत विचार करावयाचा आहे.

प्रथम लेडबीटर यांचीं मतें व शिकवणूक काय आहे तें पाहूं. प्रथमतः हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, ज्या मुलांना अगर गृहस्थांना हस्त०ची संवय जडली होती अगर ज्यांचीं मनें वैषयिक विचारांनीं पूर्ण ग्रस्त झालीं होतीं अशां-शिवाय इतरांशीं त्यांनीं यासंबंधीं ब्रही काढला नाहीं. त्यांचे सहवासांत, सिनेटसाहेबांचे चिरंजीव; सेंट्रल हिंदु कॉलेजाचे माजी प्रिन्सिपॉल अरंडेल-साहेब; Lotus Journal या, मुलांना थिऑसफीचीं तत्वें समजावून सांगण्याकरितां मुद्दाम काढलेल्या मासिकाचे संपादक, **मि. हर्बर्ट व्हाईट** वगैरे अनेक गृहस्थ आजपर्यंत आपल्या बाल्यावस्थेंत व तारुण्यांत त्यांचे सहवासांत होते, परंतु त्यांचेजवळ या बाबतींत त्यांनीं ब्रही काढला नाहीं. कारण हे सर्व गृहस्थ पूर्ण शुद्ध चित्ताचे व निर्व्यसनी होते.

**मि. हर्बर्ट व्हाइट, लेडबीटरसाहेबांचे वर्तनाबद्दल व मताबद्दल पुढील प्रमाणें लिहितातः–**

' I was closely associated with him as a boy and as a young man from 1895 to 1902, not only at meetings but helping him in any way I could, with his huge correspondence etc. and I came to know a little and love much, the great-hearted Soul who wears the form of C. W. Leadbeater, to whom so many turned for help in their difficulties and did not turn in vain. This is the picture of him which is indelibly impressed on my memory and I think I do right to recall it in forming my judgment. *I never heard from him a whisper of these views and practices against which an outcry has so rightly been raised. On the contrary, his words and his influence were ever incentives to purity.*

( Vahan, May 1907. )

**अर्थः**–' माझ्या कुमारावस्थेंत व तारुण्यांत सन १८९५ पासून १९०२ पावेतों त्यांचा ( लेडबीटर यांचा ) व माझा, फक्त सभांमधूनच नव्हे, तर त्यांच्या प्रचंड पत्रव्यवहारांत मदत करणें वगैरे अनेक तऱ्हांनीं निकट संबंध होता व त्यामुळें लेडबीटर या देहामध्यें सांप्रत वसत असलेल्या महानुभाव जीवाची थोरवी मला थोडीशी प्रत्ययास आली व त्यांजवर माझें फार प्रेम जडलें. कठिण प्रसंगीं त्यांचेकडे नेहमीं पुष्कळ लोक सल्ला घेण्यास जात व त्या जाण्यापासून त्यांचा फायदा झाल्याशिवाय राहत नसे. माझ्या स्मृतिपटावर त्यांचं जें अक्षय चित्र उमटलें आहे तें हें असें आहे. व मला वाटतें, त्यांचेविषयीं सध्यां मत ठरवितांना हें पूर्वचित्र आठवणें हें वाजवी आहे. **ज्या मतांसंबधीं व वर्तनासंबंधीं सध्यां साहजिकपणें इतका गवगवा झाला आहे. त्यांची कुणकुणसुद्धां माझे कानावर पूर्वी कधीं आलीं नाहीं. उलट त्यांचे आचार व उद्गार हे नेहमीं पावित्र्योत्तेजक असेच असत.** ( ' वाहन ' मासिक, मे १९०७. )

ज्यांना सल्ला दिली त्यांना, तिजबद्दल दुसऱ्यांजवळ न बोलण्याविषयीं इशारा देण्याची ते नेहमीं खबरदारी घेत; हेतु हा कीं, दिलेल्या सल्ल्याबद्दल

गैरसमज उत्पन्न होऊन दुष्ट संवयीचा फैलाव होऊं नये. ही गोष्ट लेडबीटर यांनीं हायकोर्टांत चौकशीचे वेळीं स्पष्ट सांगितली. ते ह्मणाले :—

'Yes, I did certainly tell him that this was not a matter to be talked about to his school friends because *sometimes boys catch these vices*'. ( Vide 'The Hindu' April 9, 1913. )

**अर्थ**–' होय, ही गोष्ट आपल्या शाळेंतील सोबत्यांशीं बोलण्यासारखी नाहीं, हें मीं त्याला सांगितलें. कारण **कधीं कधीं मुलांना हे दुर्गुण एकमेका-पासून जडतात.** ( हिंदु, एप्रिल ९, सन १९१३. )

ज्यांना सल्ला दिली त्यांना अनुद्दीपक असा उद्भिज्ज आहार, व्यायाम, दुष्ट संवयीचा भयंकर परिणाम व वैषयिक विचारांपासून प्रत्याहार, या गोष्टी ते सांगत असत. एका मुलानें यासंबंधीं आपल्या बापास लिहिलें,

'Do not call them a habit, because they *were never intended to be* any thing of the kind'. ( Vide Mrs. Beasant's Letter of Sept. 1908 to the members of the T. S. page 8. )

**अर्थः**–' यांना तुह्मीं संवय समजूं नका. कारण असें स्वरूप देण्याचा ( त्यांचा ) कधींही इरादा नव्हता. '

या सल्याबद्दल विचारलें असतां त्यांनीं सरळपणानें जबाब दिला कीं, 'I am *simply offering a solution* of a serious difficulty. It is not the common solution. *To my mind* it is far better than any other solution.' ( Vide 'The Hindu' April 9, 1913. )

**अर्थः**–'एका बिकट प्रश्नासंबंधीं मी फक्त एक उपाय सुचवीत आहें. उपाय सर्व संमत नाहीं. माझ्या मतें तो इतर कोणत्याही उपायांहून जास्त चांगला आहे.'

( हिंदु, एप्रिल ९, सन १९१३. )

**याप्रमाणें त्यांची सल्ला ही जडलेली अगर जडणारी वाईट संवय घालविण्याकरितां त्यांनीं दिली.** अशा स्थितींत त्यांनीं तें शिकविलें अगर उपदेशिलें असें ह्मणणें ह्मणजे अफीमबाजाला अगर दारूबाजाला तूं आपल्या मादक द्रव्यांचें प्रमाण कमी कर व सेवनाचा मधला वेळ हळूहळू

चाहींव, हें सांगणें ह्मणजे अफू अगर दारू घेण्यास उपदेश करणें अगर शिकविणें आहे असें ह्मणण्यासारखें आहे.

यापुढें काळे लिहितातः-" असें मी पुनः कोणासही सांगणार नाहीं, असें केव्हांही लेडबीटरनें सार्वजनिक रीत्या ह्मटलेलें नसून ही बाई त्याला पार्टीशीं घालूं पाहते, तेव्हां हं संगनमत व हा अट्टाहास कां ! " या वाक्यावरून रा. काळे यांचें वस्तुस्थितीसंबंधीचें पूर्ण अज्ञान पुनः प्रकट होतें.

सन १९०६ फेब्रुवारीमध्यें ज्या वेळीं लेडबीटर अशी सल्ला मुलांना देत असतात, ही गोष्ट बेझंटबाईच्या नजरेस आली, तेव्हांच त्यांनीं तिजबद्दल जोरानें निषेध करून ' तुह्मी फार वाईट चूक केली ' असें लेडबीटरनां समक्ष सांगितलें व बाईच्याबद्दल लेडबीटर यांना अतिशय आदर असल्यामुळें त्यांनीं ' मी पुनः अशी सल्ला देणार नाहीं, ' ह्मणून सरळपणानें ताबडतोब वचन दिलें व तें आजपर्यंत पाळलें आहे. यानंतर सन १९०६ चे मे महिन्यांत ऑल्कॉटसाहेबांनीं अनेक सभासदांसमक्ष लंडनमध्यें या प्रकरणांत चौकशी केली तेव्हां लेडबीटरसाहेबांना, 'Whether you mean to continue this course of teaching ? " अर्थः- 'हा सल्ला यापुढें देण्याचा तुमचा इरादा आहे काय ?' असा प्रश्न विचारला असतां त्यांनीं पुनः वचन दिलें कीं,

'*Seeing there is such a feeling on the matter by people whose views I respect* I do not' (Vide Proceeding of Advisory Committee 1906.)

अर्थः-ज्यांचे मताबद्दल मला आदर आहे त्यांचें याबद्दलचें मत लक्षांत घेऊन हा सल्ला पुढें देण्याचा माझा मानस नाहीं.

ही गोष्ट अमेरिकेचे चिटणीस डॉ. व्हॅन हूक यांनीं आपल्या ता. २५ । ८ । ०७ च्या सार्वजनिक पत्रांत कलम १० मध्यें लेडबीटरसाहेबांचे शत्रु अलेक्झांडर फुलर्टन यांना कबूल करण्यास लावून माफी मागणें भाग पाडलें. पुनः बेझंटबाईनीं ' सार्वजनिक उपयोगाकरितां तुमचें मत लिहून द्या ' ह्मणून लेडबीटरांना म्हटलें असतां त्यांनीं एक पत्र दिलें व तें बाईनीं Theosophist चे सन १९०८ च्या फेब्रुवारीचे अंकांत पुरवणीचें पान २१ वर छापिलें :-

"You ask me to write a formal letter, which you can show, if necessary, to say what is my present position in regard to the advice, which I gave some time ago, to certains boys. I need hardly say, that I adhere to the promise which I gave to you in February of last year ( 1906 ) that *I would not repeat that advice*, as I defer to your opinion that it is dangerous. I recognise as fully as you do that it would be so, if promiscuously given, and I had never dreamt of so giving it. "

**अर्थः**–कांहीं काळापूर्वी कांहीं मुलांना मीं जो सल्ला दिला होता त्यासंबंधीं सध्यां माझें मत काय आहे हें दर्शविणारें, जरूर पडल्यास, ( लोकांना ) दाखवितां येईल अशा तऱ्हेचें एक औपचारिक पत्र लिहून पाठविण्याविषयीं आपण मला ह्मटलें आहे. तो सल्ला देणें हें धोक्याचें आहे असें आपलें मत आहे व त्या आपल्या मताबद्दल मला आदर आहे. सबब असा सल्ला मी फिरून देणार नाहीं, असें गतवर्षी ( १९०६ ) फेब्रुवारी महिन्यामध्यें जें मीं आपल्याला वचन दिलें आहे तें मी अद्यापपावेतों पाळीत आहें. हें लिहिण्याचें अर्थात कारण नाहीं. तो सल्ला वाटेल त्याला भेदाभेद न करितां देणें हें धोक्याचें आहे हें जितकें पूर्णपणें आपण जाणतां, तितकेंच मीही जाणून आहें. मात्र अशा तऱ्हेनें ( भेदाभेद न करितां ) सल्ला देण्याचें माझ्या कधीं स्वप्नींही आलें नाहीं. "

अशा स्थिति असतां रा. काळ्यांना सार्वजनिक कबुलीजबाब किती पाहिजेत ?

यापुढें बाई लेडबीटरसाहेबांस ' पाठीशीं घालूं पहाते तेव्हां हें संगनमत व हा अट्टाहास कां ? ' हा प्रश्न राहिला. सन १९०६ चे मे महिन्यांत मि. लेडबीटरनीं सोसायटीचा राजीनामा दिल्यावर हळूंहळूं वास्तविक प्रकार काय होता, हें सभासदांना जास्त माहिती लागून कळूं लागलें. लेडबीटरसाहेबांचे सल्ल्याचें वास्तविक स्वरूप कोणतें व ती कोणत्या हेतूनें दिली हें निदर्शनास आलें. ती सल्ला बरोबर ह्मणून कित्येकांना वाटली; तर कित्येकांना ती अयोग्य व गैरसमज उत्पन्न करणारी अतएव त्याज्य अशी वाटली; पण लेडबीटरसाहेबांचे सद्धेतूंबद्दल पुष्कळांची खात्री झाली. त्यांना कित्येक स्नेह्यांच्या क्षुब्ध वृत्तीमुळें राजीनामा द्यावा लागला हें बरें झालें नाहीं व त्यांचेसंबंधीं हा अन्याय झाला, त्यामुळें त्यांच्या अनुभवज्ञानपूर्ण लेखांना व भाषणांना सोसायटी विना-

कारण मुकली, असें वाटूं लागलें; तर लेडबीटर यांचे शत्रूंना ते राजीनामा देऊन निघून गेले एवढ्यांतच समाधान न होतां, त्यांचे लेखसुद्धां कोठें थिऑसाफिकल वाङ्मयांत छापले जाऊं नयेत म्हणून ते खटपट करूं लागले, व निष्कारण वाद उकरून काढूं लागले. असा प्रकार दोन वर्षे चालला होता. अखेरीस इंग्लंडांतील सभासदांनीं ठराव केला कीं, अशा अनिष्ट स्थितीचा एकंदर सोसाटीचे ( यांत सर्व देशांतील प्रतिनिधी असतात. ) जनरल कौन्सिलनें निकाल करावा. तेव्हां हा प्रश्न कौन्सिलपुढें सन १९०८ चे डिसेंबरमध्यें येऊन त्याचा निकाल झाला व ठराव पास झाले, त्यांत अखेरचा ठराव असा होता :—

That in pursuance of this affirmation of individual liberty of each member and of his individual responsibility for his own opinions, it declares that there is no reason why Mr. C. W. Leadbeater *should not return, if he wishes*, to his place in the Society, which he has in the past served so well. ( सारांश ) सोसायटींत गोंधळ व अनिष्ट वाद माजूं नये ह्मणून लेडबीटरनीं राजीनामा दिला हें आम्हांस मान्य आहे. प्रत्येक सभासदास तात्विक, धार्मिक व नैतिक बाबतींत पूर्ण मतस्वातंत्र्य आहे. मतांबद्दल ज्याचा तो जबाबदार आहे, तेव्हां **लेडबीटर यांची इच्छा असल्यास** त्यांनीं सोसायटींत **नः येण्यास** कांहीं आडकाठी नाहीं. या बाबतींत २५ सभासदांपैकीं २२ जणांनीं वरील ठरावास अनुकूल मत दिलें. एकानें कांहींच मत दिलें नाहीं. दोघांनीं प्रतिकूल मत दिलें. ( Vide Proceedings General Council page 107, Theosophist February 1909. ) असेच ठराव पुष्कळ देशांत पुनः निराळे करण्यांत आले.

या वेळीं प्रतिकूळ मत देणाऱ्या मिस् ॲरंडेलबाई या सद्यःप्रश्नासंबंधीं पुढीलप्रमाणें लिहितात :–

“ Mrs. Besant, in her love of justice and freedom of thought-backed by the opinion of the vast majority of the Society endors, ed the resolution permitting his return, if he wished to re-enter; but is this a reason that a woman should he vilified by men who know nothing about her, and whose lives are not a hundredth part as pure as hers ? ” ( Theosophy in India, May 1913, p. 228. )

**अर्थः**—मिसेस बेझंट यांनीं आपल्या मतस्वातंत्र्य व न्यायप्रियतेखातर सोसायटीचे प्रचंड बहुमतानें त्यांना ( लेडबीटर यांना ) सोसायटींत परत येण्यास त्यांची इच्छा असल्यास मोकळीक असावी अशाबद्दलच्या ठरावास संमति दिली हें खरें. पण ह्मणून, ज्या माणसांना त्यांजविषयीं ( बेझंटबाईविषयीं ) यत्किंचितही माहिती नाहीं व ज्यांचें जीविताचें पावित्र्य त्यांच्या ( बेझंटबाईच्या ) चारित्र्याच्या पवित्रतेबरोबर शतांशानेंही तुलणार नाहीं त्यांनीं त्यांची नालस्ती करावी याला हें योग्य कारण होईल काय !

**यावरून स्पष्ट होत आहे कीं, लेडबीटर यांना बाईंनीं पाठीशीं घातलें नसून सर्व सोसायटीनें मताधिक्यानें त्यांना परत येण्याविषयीं परवानगी दिली व कांहींकांनीं पाचारणही केलें.**

आतां खुद्द बाईचे मतांबद्दल, थिऑसफीचे अंतःशाखेंत, बाई सुद्धां 'जननेंद्रियांचा दुरुपयोग व उद्दीपन हीं अनेक अशा उत्तेजक दिव्य लोकांतील शक्तीपैकीं एक शक्ति आहे' असें शिकवितात, असें विधान रा. काळे करतात व त्यांचे पुष्टीकरणार्थ कोर्टात चौकशी चालू असतां उलटतपासणींत बाईंना केलेले प्रश्न व त्यांनीं दिलेली उत्तरें हीं आधारास घेतात. रा. काळे यांनीं जो यासंबंधीं उतारा घेतला त्यांत चूक केली आहे. अर्थात भाषांतर चुकीचें झालें हें ओघानेंच आलें. उतारा घेतांना तो पुरा न घेतां त्यांतील अखेरचें महत्वाचें वाक्य गाळिलें. पुनः उलटतपासणींतीलच प्रश्नोत्तरें घेऊन मुद्याचा विचार संपविला. त्याच चौकशींत बाईंनीं त्याच मुद्यासंबंधीं फेरतपासणींत जो खुलासा केला आहे तो सोडून दिला. कोणाची जबानी घ्यावयाची व त्यावर जर निकाल करावयाचा तर तपासणी, उलटतपासणी व फेरतपासणी या तिन्हींत दिलेल्या जबानीचा विचार एकत्र व्हावयास पाहिजे, हें लिहिणें नको.

ना. सा. ब. खंडाळेवाला यांचे पत्रासंबंधीं प्रश्नोत्तरें काय आहेत तीं ता. ५।४।१३च्या हिंदूंत पहावीं म्हणजे रा. काळे यांनीं केलेला गैरसमज लक्षांत येईल. Stimulating astral powers असें अवतरण न घेतां is one of the many stimulating powers असें चुकीचें व आत्मविद्येच्या दृष्टीनें निरर्थक अवतरण घेऊन रा. काळे यांनीं अर्थ चुकीचा केला, व '( या मार्गाचा ) उपयोग **वाममार्गातील** कांहीं संप्रदायांकडून पुष्कळ केला जातो.'

हें वाक्य इतकें महत्वाचें असून अजीबात गाळलें व तो मार्ग बेझंटबाई शिकवितात हा चुकीचा समज वाचकांचा करून दिला. इतकेंच नव्हे तर या बाबीसंबंधीं फेरतपासणींत बाईनीं खुलासा केला तोही गाळून टाकला.

रा. ब. खंडाळेवाल्यांचे पत्रास उद्देशून पुढील प्रश्नोत्तरें झालीं :-

## तपासणी

Q.--In that letter it is said as follows:-' You say that in fact excitement and misuse of sexual organs is one way of stiumlating astral powers and is largely used in some schools of Pseudo-Occultism. "

Did you say so at any time ?

A.—Yes ! certainly.

Q.—Again, it is stated that in that letter that you have put it as a fact before E. S. members that excitement and misuse of sexual organs leads to the acquirement of astral powers. Did you ever say so; is this view of yours correct ?

A.—Yes, I did; it is a well-known fact known tc-many educated people.

अर्थः—प्र.–त्या पत्रांत असें म्हटलें आहेः–' तुह्मी म्हणतां कीं, भुवर्देहाच्या शक्ति उद्दीपित करण्याचा एक मार्ग जननेन्द्रियांचें उद्दीपन व दुरुपयोग हा होय व ( या मार्गाचा ) वाममार्गांतील कित्येक संप्रदायांतून पुष्कळ वेळां अवलंब केला जातो. ' असें आपण कधीं म्हणालां काय !

उ.:–होय; खरोखरच ( म्हणाले ).

प्र.:–पुनः, त्या पत्रांत असें म्हटलें आहे कीं, ' अंतःशाखेचे सभासदांपुढें तुह्मीं सांगितलें कीं, जननेंद्रियांचें उद्दीपन व दुरुपयोग यांनीं भुवर्देहांच्या शक्ती साध्य होतात. ' असें आपण कधीं म्हटलें काय ! हें आपलें मत बरोबर आहे काय ?

उ.:—होय, मी म्हणालें; वरील मत पुष्कळ सुशिक्षित लोकांस माहित आहे.

वरील प्रश्नोत्तरांचें तर अवतरणच दिलें नाहीं, इंदुप्रकाशांतील ( ता. २३ मे १९१३ ) टीकाच आधार ह्मणून घेतली आहे. हा प्रकार ह्मणजे अच्या जयाचावर बला फांसावर चढवावयाचा! मूळ अवतरणांत फक्त—It is a well-known fact known to many educated people असें आहे; तर इंदुप्रकाशानें त्या*every* educated Indian knew that असें फुगविलें व रा. काळे यांनीं तें वेदतुल्य ग्रहण केलें व दिलें मत झोंकून!

फेरतपासणींत पुढील प्रश्नोत्तरें झालीं:-

Q.:-You know that Khandalawala's letter refers to pseudo-occultism.

A.—Yes

Q.—Is that your occultism?

A.-No.

Q.-What is the ordinary local term for pseudo-occultism?

A.-Black magic.

अर्थः—प्र.:—खंडाळावाल्यांचे पत्रांत **वाममार्गासंबंधीं** उल्लेख आहे काय?

उ.:—होय.

प्र.:—तो **तुमचा मार्ग** आहे काय?

उ.:—नाहीं.

प्र.:—वाममार्गाला लौकिक संज्ञा काय आहे?

उ.:—चेटकविद्या.

**वरील समग्र विवेचनावरून हें स्पष्ट आहे कीं, वरील मतें बाईंचीं नसून वाममार्गाचीं आहेत व विषयाचें प्रतिपादन करीत असतां प्रतिपादन सर्वांगानीं व्हावें ह्मणून जातां जातां वाममार्गांतील प्रचारासंबंधीं उल्लेख करीत आहेत. बाईंचीं मतें**

पूर्णपणें योगमार्गाचीं अथवा दक्षिणमार्गाचीं आहेत हें त्यांचा कोणताही ग्रंथ पाहतां कळून येईल.

---

लेखांक ७.

## मतभेद बिलकुल सहन होत नाहीं.

वरील मथळ्याचा रा. काळे यांचा सहावा लेख आहे. बेझंटबाईंना बिलकुल मतभेद सहन होत नाहीं, हा मुद्दा घेऊन त्याच्या पुष्टीकरितां बाईंचे व्याख्यानांतील एक उतारा दिला आहे. त्याचा आशय असाः—" निंदेस प्रतिनिंदा, शिव्यांस प्रतिशिव्या देऊं नका. जे लोक तुमच्याशीं सहनशीलतेनें वागत नाहींत त्यांच्याशी वागतांना शम हा गुण तुमच्यांत आहे हें दाखवा. ते तुमचा द्वेष करीत असले तर तुह्मी त्यांचेवर प्रेम करा." वगैरे वगैरे. रा. काळे यांचें म्हणणें कीं, हे शब्द गोड आहेत, पण बाईंचें वर्तन मात्र तसें नाहीं. हें दाखविण्याकरितां त्यांनीं कोल्हापूरदरबारचे माजी डॉ. खेडकर यांजविषयीं बाईंचे थिऑसफिस्ट मासिकाच्या नोव्हेंबर १९११ पान १९५ वर काढलेले उद्गार प्रमाण म्हणून घेतलेले आहेत. डॉ. खेडकर यांनीं 'वेदांतिन्' या मासिकांत बाईंचा निवृत्तिमार्ग आलस्योत्पादक आहे म्हणून एक चकाचें विधान केलें. वास्तविक पाहिलें तर बाईंच्या व्याख्यानांतून व ग्रंथांतून आत्मविद्येंतील कोणत्याही विषयाच्या तात्विक भागाचें विवेचन संपल्याबरोबर त्या ज्ञानाचा जीवितामध्यें व नित्याच्या व्यवहारांत कर्मरूपानें व अखंड उद्योगरूपानें उतरण्याची आवश्यकता व मार्ग हीं दिलेलीं पदोपदीं आढळतील व या शिकवणुकीस अनुसरून बाईंनीं गेलीं पंचवीस वर्षें एकसारखें आपल्या परिव्राजकस्थितीला अनुरूप आत्मज्ञानाच्या अध्यापनाकरितां सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतून स्वीकारलेलें अखंड परिभ्रमण, श्रोतृवृंदाचीं हृदयें थरारून सोडणारीं व उद्योगास लावणारीं शेंकडों व्याख्यानें, अनेक ग्रंथ, योगशास्त्र-अध्या-

पन, बनारस येथील सेंट्रल हिंदु कालेज, Sons of India, Order of the Star; वगैरे अनेक संस्था व थिऑसाफिकल सोसायटीचीं अनेक संस्थांतील लोकोपयुक्त कार्यें करण्याकरितां सर्व देशांतील आपल्या भोंवतीं जमविलेले शकडों स्वार्थत्यागी व विद्वान् स्त्रीपुरुष या सर्व गोष्टीच त्यांच्या शिकवणुकीचीं व स्वतःचे उद्योगाचीं उत्कृष्ट प्रमाणें होत. असें असतां डॉ. खेडकरांचे विधानांत काय तथ्य आहे याबद्दल त्याच पानावर बाई ह्मणतातः—

'This inactive life is the last accusation one would have expected as regards myself, who am, often in India, accused of over-activity.'

अर्थः--हा आलस्यमय जीविताचा आरोप माझ्यासंबंधानें तर अगदींच अनपेक्षित आहे. उलट हिंदुस्थानांत मजवर उद्योगातिरेकाचा आक्षेप आहे.

यानंतर बाई लिहितात कीं, डॉ. खेडकर हे इंग्लंडांत असतां त्यांनीं थिऑसफिकल सोसायटीच्या अनेक शाखांची आपल्या कार्यास मदत मागितली आहे. परंतु मनांतून ते थि. सो. ला प्रतिकूळ आहेत. ते आपल्या परीनें इंग्लंडांत उपयुक्त कार्य करीत आहेत हें ठीक आहे व त्यांत त्यांना यश यावें असें आपण इच्छित असावें. पण ते आपल्या थिऑसफिकल सोसायटीच्या विरुद्ध कार्य करणारे आहेत, हें मात्र ओळखून असावें. बाई ह्मणतातः—

'However, every preacher of Eastern thought may do useful work in England *so we may wish well to that part of Dr. Khedkar's work* while remaining conscious that he nourishes enmity to the Society within his heart.'

अर्थः-तथापि, पौर्वात्य विचारपद्धतीचें व्याख्यान करणाऱ्यांस इंग्लंडमध्यें उपयुक्त काम करतां येईल. म्हणून डॉ. खेडकर यांचे त्या कार्यास आह्मीं अभीष्ट चिंतावें हें योग्य आहे. पण त्याबरोबरच, डॉक्टरसाहेब हें थिऑसफिकल सोसायटीसंबंधीं आपल्या मनांत वैर वागवितात, हें लक्षांत असूं द्यावें.

या उद्गारांत काय वावगें आहे? यांत प्रतिनिंदा, शिव्या, द्वेष अगर प्रेमाचा अभाव कोठें आहे! दुसऱ्यांचे मताबद्दलची असहिष्णुता कोठें आली!

**आंत एक बाहेर एक असले वेदांती ओळखूनही न ठेवणें ह्मणजे साधुपणा नसून अजागळपणा आहे.**

वास्तविक थिऑसफिकल सोसायटीचा इतिहास पाहिला तर बाईची दुसऱ्यांच्या मतांबद्दल सहिष्णुताच नव्हे तर आदर पदोपदीं आढळेल. सोसायटीचे उपाध्यक्ष मि. सिनेट यांचीं व बाईचीं मतें कधींही जमत नाहींत, तरी पण त्यांनीं थि. सोसायटीची केलेली सेवा व त्यांची योग्यता लक्षांत आणून बाईनीं स्वतः आपल्या अधिकारांत त्यांना सन १९०७ व सन १९११ या दोन प्रसंगीं उपाध्यक्ष नेमिलें. ते अजून स्वतंत्रपणें काम व अध्ययन करितात. दोघेही एकमेकांच्या कार्यांत कधींही आड येत नाहींत. याचें ताजें उदाहरण 'अड्यार बुलेटिन' मासिकाचा ( Adyar Bulletin) १९१३ चा जुलईचा अंक पहावा व त्यांतील सिनेटसाहेबांचें मतभेददर्शक पत्र वाचावें. जर्मनांचे माजी जनरल सेक्रेटरी डॉ. स्टायनर यांचे ग्रंथांतील तत्त्वज्ञानाविषयक अनेक मतें बाईच्या माताविरुद्ध असतां त्यांचे ग्रंथांचीं इंग्रजी भाषांतरें करवून त्यांस स्वतः उत्तेजनपर प्रस्तावना लिहून छापविलीं व तीं इंग्रजी जाणणाऱ्या लोकांच्या नजरेस आणून दिलीं. सन १९०७ सालीं हिंदुस्थानांतील थि.सो.-चे जनरल सेक्रेटरी प्रसिद्ध विद्वान् गृहस्थ बाबू उपेंद्रनाथ बसू, बी.ए. बी. एल, यांशीं मतभेद झाला असतां व पुष्कळ मंडळी त्यांचे विरुद्ध असतां त्यांची निवडणूक पुनः त्याच जागीं जमलेल्या लोकांस योग्य सल्ला देऊन करविली.

पुनः १९११ डिसेंबरमध्यें त्यांचा मतभेद पुष्कळ झाला असतां बाईनीं बाबू भगवानदास, एम्. ए., यांना **जनरल सेक्रेटरी** निवडण्याविषयीं केवळ त्यांची विद्वत्ता व योग्यता यांजकडे लक्ष देऊन शिफारस केली. बंगालचे प्रसिद्ध थिऑसफिस्ट हिरेंद्रनाथ दत्त, एम्. ए. बी. एल्., यांच्या सूचनेवरून इंडियन सेक्शन ( Indian Section )चे कौन्सिलनें सोसायटीचे 'अध्यक्षांची निवड सात वर्षांपुरती नसतां त्या त्या व्यक्तीचे आयुमर्यादेपर्यंत असावी' असा नियमांत फरक करावा ह्मणून ठराव केला असतां वाहत्या गंगेंत हात धुवून न **घेतां**. 'निरनिराळ्या प्रश्नासंबंधीं सोसायटींत सध्यां मतभेद आहेत अतएव माझ्या विरुद्ध असलेल्या मंडळींना, नियमांत हा फरक न करतां, अध्यक्षांची निवडणूक होण्याची व त्यावर मत देण्याची संधि व हक्क राहूं द्यावा', असा जबाब दिला. हायकोर्टाचे चौकशींत मुंबईचे प्रसिद्ध विद्वान् सॉलिसिटर

मि. विमादलाल यांनीं वादी मि. जी. नारायणअय्याच्या तर्फे कमिशनवर झालेल्या साक्षींत यासंबंधीं बाईंना पुढील सर्टिफिकेट दिलें:–

" I have written on Mrs. Besant's policy in Theosophy in India and Adyar Bulletin, *Mrs. Besant never used her Eastern School position to stop me.* Mrs. Besant has *never said anything* against the resolution of our Lodge, above referred to, in the Eastern School *nor was I removed form my post as Warden......* I personally did not feel any difficulty in the Eastern School *because of difference of opinion* with Mrs. Besant.

( Vide The Hindu, March 29th 1913. )

हीं सर्व परमतासहिष्णुतेचीं उदाहरणें आहेत काय ?

यापुढें रा. काळे बाईच्या ठायीं वसत असलेले अहंकार, दुराग्रह दुसऱ्याबद्दलचा अनादर याबद्दल लिहितात. पुष्टीकरणार्थ या बाईचे १९१२ चे दिसेंबरमध्यें झालेल्या व्याख्यानांतील उतारे देतात. पहिला उतारा अंतःशाखेचे अध्वर्युत्वाबद्दलचा आहे. हें अध्वर्युत्व बाईंनीं सोडून द्यावें, असा अज्ञानमूलक उपदेश एका सभासदानें केल्यावरून जबाबादाखल बाई म्हणाल्या कीं, ' या जागीं माझी नेमणूक माझे गुरुदेव व मॅ. ब्लॅव्हट्स्कीबाई यांनीं केलेली आहे, व त्यांची आज्ञा झाल्याशिवाय ही जागा मी आमरणांत सोडणार नाहीं. " जगाचे पाठीवर जे अनेक योगसंप्रदाय आहेत त्यांपैकीं थिऑसफिकल सोसायटीची **अंतःशाखा** ही एक आहे. या शाखेच्या अध्वर्यु आपल्या गुरुदेवांच्या आज्ञेवरून प्रथम ब्लॅव्हट्स्कीबाई होत्या. सध्यां बेझंटबाई आहेत. यांत योगमार्गाचें शिक्षण दिलें जातें. असें शिक्षण देण्याची योग्यता बाईचे अंगीं आहे अशी ज्यांची समजूत आहे व ज्यांना या सांप्रदायाचे नियम कबूल आहेत ते या संप्रदायांत येतात. अशा संप्रदायाचें अध्वर्युत्व हें गुरुदेवांचे नेमणुकीनें एखादे व्यक्तीकडे येईल कीं, सांप्रदायिकांचे निवडणुकीनें येईल याचा विचार तज्ज्ञ वाचकांनाच कळणें शक्य आहे. आपल्याकडे रामदास-संप्रदाय, नाथसंप्रदाय वगैरे अनेक संप्रदाय आहेत. यांतील अध्वर्यूची योजना काय सांप्रदायिकांनीं केली होती ? या एकंदर विषयांची चर्चाच सुरू करणें म्हणजे योगसंप्रदाय व त्यांचें स्वरूप याजविषयीं पूर्ण अज्ञान प्रगट करणें होय.

आतां **थिऑसफिकल सोसायटी**चे अध्यक्षत्वाबद्दल याविषयीं बोलतांना बाईंनीं गुरुदेवाचें नांवही काढलें नाहीं. पण रा. काळे यांनीं त्यांच्या विचारसरणीचें पृथःकरण ह्मणून करतांना थिऑसफिकल सोसायटी व तिची अंतःशाखा या दोन्ही संस्थांचे अध्यक्षत्वाबद्दलचा प्रश्न एक करून गुरुदेवांचें नांव आणून गोंधळ केला आहे. वास्तविक या दोन संस्था अगदीं अलग. त्यांचे नियम, अंतर्रचना, व्यवस्था, जमाखर्च अगदीं निराळे. **थि. सो. चे अध्यक्षाची निवडणूक सभासदांचे ⅔ मताधिक्यावर, तर अंतःशाखेचें अध्वर्युत्व गुरुदेवांचे हातांत,** ह्मणून बाई दोन बाबींसंबंधीं उत्तर निरनिराळें देतात; थि. सो. चे बाबतींत गुरुदेवांचें नांवही न काढतां फक्त एकंदर सभासदांचे ⅔ मताधिक्यावर निवडणूक अवलंबून असल्यामुळें अध्यक्षाचे जागेकरितां असलेला हा उमेदवार ( Non-entity ) शून्यवत् नसून जगात वजन असलेला व वाकबगार असणें जरूर आहे, हें सांगतात असा असण्यास तो सर्व देशांतील सभासदांना माहित असलेला असा असावा नाहींतर त्यास ⅔ मतें मिळणें शक्य नाहीं. ही उक्ति अहंकाराची म्हणून रा. काळे पुढें ठेवीत आहेत व ती कित्येकांना तशी वाटेल, पण ज्यांना बाईंची योग्यता व स्वभाव माहीत आहे व असलें विधान अहंकारवृत्ति उठल्याशिवाय करणें त्यांना शक्य आहे असें ठाऊक आहे व या उक्तीचे वेळीं जे हजर होते त्यांना ती तशी वाटणार नाहीं ! या उद्गारांतील जमलेल्या सभासदांना ( Non-entity ) शून्यवत् ह्मटल्याबद्दल रा. काळे यांचा आक्षेप आहे व हें लक्षण बाईंनीं हिंदी सभासदांना अनुलक्षून ह्मटलें, असें ते दिग्दर्शन करितात; पण जेथें व्याख्यान झालें ती सभा सर्व देशांतील सभासदांची होती व सर्वांना अनुलक्षून ती आहे. फक्त हिंदी गृहस्थांस अनुलक्षून नाहीं. आतां शून्यवत् हा शब्दच मुळीं बाईंनीं कां वापरला आहे, हें पाहूं.

अलीकडे निघालेल्या ' ऑर्डर ऑफ दि स्टार ' (Order of the Star), या संस्थेचे विद्यमानें बाई ' सद्गुरूंचें आगमन ' या विषयावर पुष्कळ व्याख्यानें देतात, हें सर्वांस माहीत आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं व लेडबीटर यांनीं दिव्यदृष्टीनें जगाच्या पूर्वेतिहासासंबंधीं शोध करून ते Rents in the veil of time, Man: Whence, How and Whither, या ग्रंथांत प्रकाशित केले आहेत. बाईंचा उद्योग प्रचंड असल्यामुळें त्यांनीं सर्व देशांतील लोकांचें लक्ष

या विषयाकडे वेधून टाकिलें आहे. अनेकांना अनेक कारणांनीं हें न आवडून हीं मतें मुळीं थिऑसफीचे विरुद्ध आहेत अशी हूल या असंतुष्टांनीं उठविली, तेव्हां बाईनीं यांस जबाब दिला कीं, 'थिऑसफीचीं तत्वें अशीं कांहीं बोटांनीं मोजून नियमित केलेलीं नाहींत. थिऑसफी हें ज्ञान आहे. अनंत आहे. या खाणींत ज्यांनीं त्यांनीं परिश्रम करून फळ घ्यावें. जगद्गुरूंचें आगमन व पूर्वेतिहास हीं तत्वें थिऑसफीचीं नाहींत तर गुरुदेवांचें अस्तित्व, कर्म व पुनर्जन्म हीं तरी थिऑसफीचीं कोठें आहेत ! जो तो मनानें स्वतंत्र आहे. ज्यास जें पटेल तें त्यानें ग्रहण करावें. दुसऱ्यांना दुसरीं मतें ग्राह्य वाटल्यास त्यांना तीं ग्रहण करूं द्यावीं. थि. सो. चे कोणत्याही सभासदास जर हें स्वातंत्र्य आहे तर तें मी अध्यक्ष आहें ह्मणून मला कां नाहीं ! मी अध्यक्ष ह्मणून मुळींच कांहीं मत नसलेला असा चिखलाचा गोळा आहें कीं काय ! मीं आजपर्यंत मतस्वातंत्र्याकरितां झगडलें आहें व तें मी कधींही सोडून देणार नाहीं. **मी शून्यवत् होणार नाहीं.** व दुसरे होत नाहींत अशी खबरदारी ठेवीन.' याविषयीं बाई लिहितातः—

'A few members of this Society are striving with might and main to persuade the public that I am trying to impose my own views on the Society and to narrow its broad basis. In vain do I urge on members time after time, the duty of perfect tolerance and mutual respect; in vain do I proclaim in official gatherings of the Society the perfect liberty of opinion which exists therein, and the fact that nothing is required for membership save acceptance of human Brotherhood, in vain do I print in my own journals views at variance with mine. *Unless I consent to be colourless to express no opinions, to be in fact a King-Log and renounce all activity these* members will declare that I want to force my personal opinions on the Society. If they were logical, they would see, that to teach reincarnation and Karma is quite as *Sectarian* as to preach the coming of the World Teacher.'

( Vide Theosophist, June 1912, pages 324-25. )

तेव्हां अशी ( colourless non-entity ) शून्यवत् होण्यास मी तयार नाहीं व असा शून्यवत् अध्यक्ष तुह्मी निवडूं नका, असें सांगण्याचा बाईचा

मनोदय आहे. दुसऱ्यांना शून्यवत् ह्मणून लेखण्याचा किंवा म्हणण्याचा नाहीं हें स्पष्ट आहे.

---

### लेखांक ६.

## दोन कृष्ण व दोन शंकराचार्य.

सुप्रसिद्ध थिऑसफिस्ट मि. लेडबीटर यांनीं अड्यार बुलेटिन ( Adyar Bulletin ) या मासिकाच्या मे १९११ इ. च्या अंकांत ‘ धर्मांची स्थापना ’ ( The Founding of Religions ) या नांवाचा एक लेख लिहिला, त्यांतील विधानांवर एक टीकात्मक लेख रा. काळे यांनीं केसरीच्या ता. ४ जुलै सन १९११ च्या अंकांत प्रसिद्ध केला.ते लिहितात कीं, मि. लेडबीटर यांचीं मतें ‘ धर्म व इतिहास या दोहोंसही संमत नसलेलीं अशीं कांहीं चमत्कारिक आहेत; ’ ‘ त्यांत अनेक ब्रह्मघोंटाळे असून पुष्कळ बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न झालेला आहे; ’ इतकेंच नव्हे तर ‘ ब्रह्मविद्येच्या ( थिऑफीच्या ) नांवाखालीं असले सिद्धांत तुम्हांस खपतात तरी कसे ! ’ असा यांनीं आपले लेखाचे शेवटीं भारतीय वाचकांना प्रश्नही विचारला आहे. यावरून त्यांच्या मतें मि. लेडबीटर यांचीं विधानें, इतिहास, धर्म व ब्रह्मविद्येचीं तत्वें या तिहींनाही विरोधी आहेत. आतां या विधानांचा तिन्ही दृष्टींनीं पृथक् विचार करूं.

ब्रह्मविद्येचीं सनातन तत्वें सारांशानें म्हटलीं म्हणजे हें सर्व जग एका ब्रह्मवस्तूपासून निर्माण होऊन अखेरीस त्याचा लयही ब्रह्मांतच होतो; निर्मित स्थितींत सर्व विश्वाचा शास्ता एक ईश्वर अथवा जनार्दन असतो; ब्रह्मा, विष्णु, महेश या त्याच ईश्वराच्या कार्यपरत्वें तीन मूर्ती अथवा अंगें आहेत; त्याचे सहायक असे देवांचे व ऋषींचे गण असतात; सृष्टींतील अखिल जीवांची उत्क्रांति कर्म व पुनर्जन्म या तत्वानुसार वरील देव व ऋषी यांच्या साहाय्यानें होत असते; या उत्क्रांतीचें क्षेत्र भू, भुवः व स्वः या त्रिलोकीं होत असतें;

अशा प्रकारचीं आहेत. तेव्हां मि. लेडबीटर यांनीं गौतमबुद्धांचे व मैत्रेयांचे जे निरनिराळ्या काळांत झालेले जन्म दिले आहेत त्यांचा किंवा भारतीय काळांतील श्रीकृष्ण व भागवतधर्मप्रवर्तक श्रीकृष्ण व आद्यशंकराचार्य व प्रस्तुतच्या भाष्यग्रंथांचे लेखक शंकराचार्य हे वेगळे, या विधानांचा वरील सनातन तत्वांशीं कोणत्याही रीतीनें विरोध नाहीं व तो होण्याचें कारणही नाहीं. वास्तविक या विधानांचा व ह्या तत्वांचा संबंधही नाहीं. कारण ह्या विधानांतील प्रश्न ऐतिहासिक आहे, धार्मिक नाहीं.

ज्यांना आपण पूज्य व मान्य असे धर्मसंस्थापक व धर्मप्रवर्तक, प्रत्यक्ष ईश्वरी अवतार समजतों, त्यांचे चरित्रांविषयीं जेव्हां प्रश्न उपस्थित होतो तेव्हां ते पूज्य व अवतारी पुरुष म्हणून किंवा त्यांचीं चरित्रें पवित्र व उदात्त म्हणून पौराणिक व धार्मिक ग्रंथांत लिहिलीं आहेत; म्हणून तो प्रश्न ऐतिहासिक नाहीं, असें होत नाहीं. तशांतून मि. लेडबीटर यांचीं विधानें निंदाव्यंजक अगर उपहासपर अशीं असतीं तर गोष्ट वेगळी. ते किंवा दुसरे कोणतेही थिऑसफिस्ट ग्रंथकार या विषयासंबंधीं लिहितांना त्यांचे उद्गार पूर्ण गंभीर व अत्यंत आदरपूर्वक असे असतात. हें त्यांनीं श्रीकृष्णाविषयीं लिहितांना 'He led here in India a very wonderful life', 'This great incarnation', वगैरे काढलेल्या उद्गारांवरून व मिसेस बेझंट व इतर सभासदांच्या लेखांवरून व भाषणांवरून स्पष्ट कळून चुकेल. तेव्हां अशा पूर्ण आदरयुक्त पण ऐतिहासिक तऱ्हेनें या प्रश्नांचा विचार व ऊहापोह केल्यानें बुद्धिभेद होतो हें म्हणणें वाजवी नाहीं. उलट ज्या ग्रंथांना आपण इतके पवित्र व पूज्य मानतों त्या ग्रंथांतून बहुत काळ लोटल्यानें किंवा विधर्मीयांच्या द्वेषबुद्धीनें ज्या चुका किंवा प्रक्षित भाग आलेले असतील त्यांची छाननी होऊन ते दुरुस्त करणें व अशा प्रकारें त्यांचें संशोधन करणें, हें प्रत्येक धर्माभिमान्याचें कर्तव्य आहे. अशा तऱ्हेनें ते ग्रंथ जास्तच उज्वलित होतील. अशा प्रकारचे संशोधक विचार व वादविवाद हीं राष्ट्राच्या मानसिक जागृतीची साक्ष देतात. असले वादविवाद पाश्चिमात्य राष्ट्रांतून चिकित्सक पद्धतीनें (Higher criticism) पुष्कळ झाले व होतात. मि० लेडबीटर व बेझंटबाई यांनीं खुद्द जीजस क्राईस्ट यांचा काल दिव्य दृष्टीच्या साहाय्यानें इ० स० पूर्वी १०५ वर्षें ठरविला आहे व हा ख्रिस्ताचा काल ठरवितांना इतर लेखक इ० स० नंतर जन्मलेल्या दुसऱ्या एका जीजस नांवाच्या

धर्मवेड्या बैराग्याला जीजस क्राईस्ट म्हणून चुकीनें समजलें; जीजसचे बारा शिष्य ह्या ऐतिहासिक व्यक्ति नसून केवळ बारा राशींचीं रूपकें आहेत, वगैरे शोध त्यांनीं नमूद केले आहेत व ते कित्येक पाश्चिमात्य पंडितांनाही संमत झाले आहेत. आपल्याकडेही ऐतिहासिक व विवेचक अशा पद्धतीनें डॉ. भांडारकर, रा. ब वैद्य, काळकर्ते रा. परांजपे व इंदूरचे प्रो॰ गोखले यांनीं आपल्या ग्रंथांतून व भाषणांतून असल्याच प्रश्नांसंबंधीं विचार केलेला आहे. सारांश, हा प्रश्न मुळीं धार्मिक नसून केवळ ऐतिहासिक आहे.

तसेंच धर्मग्रंथांतील व संतांचे उद्गारांतील परंपरागत प्रघात पाहिला तरी थोर व्यक्तींच्या निरनिराळ्या काळांतील जन्मनिर्देश नेहमीं आढळतो. भक्तिविजयांत कोणचे संत कोणाचे अवतार, तें प्रारंभींच दिलें आहे. तुकाराम-महाराजांनीं तर आपण चार युगांचे ठायीं प्रल्हाद, अंगद, उद्धव, नामदेव वगैरे रूपांनीं अवतरलों ह्मणून स्वतः अभंगाचे रूपानेंच उल्लेख केला आहे. तसेंच एकाच नामाभिधानाचे अनेक पौराणिक धर्मप्रवर्तक व ऋषी आहेत.

रा॰ काळे लिहितात, ‘जगांतील यच्चयावत् तत्ववेत्ते व धर्मवेत्ते एकाच पुरुषाचे अवतार कसे होऊं शकतील ?’ पण असें विधान मि॰ लेडबीटर यांनीं कोठेंही केलेलें नाहीं. प्रस्तुत लेखांतच त्यांनीं गौतम, मैत्रेय, कृष्ण, शंकराचार्य अशा चार व इतर व्यक्तींचा निर्देश केला आहे. त्याचप्रमाणें श्रीकृष्णांच्या धर्माहून ख्रिस्तांचा धर्म जास्त सर्वव्यापी ( Universal Religion ) आहे. असेंही त्यांनीं म्हटलेलें नाहीं. ते म्हणतात, नवीन प्रदेशांत (new countries) प्रसार पावेल असा धर्म स्थापण्याचा प्रथम प्रयत्न ख्रिस्त या अवतारांत झाला, कारण हिंदुस्थान हा जुनी वस्ती, ( old country ) पुरातन काळापासून वसलेला प्रदेश समजला जातो. पण दोन्ही जन्म एकाच व्यक्तीचे तेथें उच्च-नीच भाव कोठला ! तसेंच मैत्रेयबुद्ध हे गौतमानंतर पांच हजार वर्षांनीं येणार असल्याचा उल्लेख रा॰ काळे हे महावंशांतून देतात व तें खरें आहे. कारण पांच हजार वर्षांनीं मैत्रेय येतील ते बुद्धस्थितीला पोंचलेले येतील. सध्यां ते ‘बोधिसत्व *’ आहेत. व सध्यांचे त्यांचे अवतार ‘बुद्ध’ म्हणून नसून ‘बोधिसत्व’ म्हणून आहेत.

भूतकालीन माहिती दोन तऱ्हेनें मिळते. एक तत्कालीन अगर त्यानंतरचे लोकांनीं पाहून अथवा ऐकून मिळविलेल्या माहितीवरून लिहिलेले ग्रंथ, ज्यांना

---

* टीप—अनेक जन्मानंतर जो पुढें **बुद्ध** होणार अशास ( मनुष्य, देव अथवा प्राणी ) जातककथांमध्यें **बोधिसत्व** हीं संज्ञा दिली आहे.

आपण इतिहास म्हणतों ते, अगर शिलालेख वगैरे. दुसरी तऱ्हा त्रिकालज्ञानदृष्टीची. पैकीं सध्यांच्या जडवादाच्या काळीं पहिलीच तऱ्हा काय ती सर्वमान्य आहे. तेव्हां प्रथम तिचाच विचार करूं. या इतिहासग्रंथाशीं मि० लेडबीटर यांचीं विधानें विरोधी आहेत, असें सकृद्दर्शनीं भासण्यासारखें आहे हें खरें. पण इतिहासग्रंथ म्हणजे नेहमीं चिनचूक व पूर्ण विश्वसनीयच असतात असें नाहीं. सर वॉल्टर रॅलेनें सर्व जगाचा इतिहास लिहीत असतां आपल्या डोळ्यांसमोर झालेल्या खुनाच्या हकीकतीचा विपर्यास झालेला पाहून हस्तलिखित कागदांचें पुटोळें अग्नींत टाकलें; शिवाजीमहाराजांनीं अफझुलखानास मारिलें, असा इतिहास रा. करकेरिया यांचे लेखानें बदलला; सदाशिवरावभाऊंचे डोक्यावरील पानपतचे पराभवाबद्दलचें खापर रा. राजवाड्यांचे परिश्रमांमुळें उतरलें गेलें; शेक्स्पीयरचीं नाटकें त्यांनीं लिहिलेलीं नसून तीं बेकननें लिहिल्याबद्दलचा बेकन सोसायटीचा शोध वगैरे गोष्टी सर्वविश्रुत आहेत. हे सर्व इतिहासच होते, पण कांहीं व्यक्तींच्या परिश्रमांमुळें खोटे ठरले व ठरण्याचे बेतांत आहेत. तेव्हां इतिहासग्रंथ म्हणजे अगदीं श्रुतिवाक्य नाहींत.

आतां दुसरी तऱ्हा दिव्यदृष्टीचे शोधांची. सध्यांच्या काळीं जरी इजवर समाजाचा विश्वास नाहीं तरी तिजबद्दल सर्व धर्मांचे ग्रंथांतून स्पष्ट उल्लेख आहेत. आद्यकवि श्रीवाल्मीकांनीं पुढें होणाऱ्या श्रीरामचरित्राचें आधीं कथन केल्याचें सर्वविश्रुत आहे. तसेंच जयदेवांनीं कृष्णलीलेलेचें त्यांना श्रीकृष्णप्रसादानें जसें दिसलें तशा चित्रावरून वर्णन केल्याचें प्रसिद्ध आहे. तेव्हां प्रश्न काय तो एवढाच कीं, मि. लेडबीटर यांना तशी शक्ति आहे, कीं नाहीं ? याचा उलगडा होण्यास एक तर त्यांचा स्वतःचा शब्द अगर त्यांचे सहवासाचा लाभ ज्यांना कमीअधिक झाला आहे, त्यांचा शब्द प्रमाणभूत मानला पाहिजे. त्यांना तशी शक्ति असल्याबद्दल त्यांनीं अनेक वेळां आपल्या ग्रंथांतून उद्गार काढले आहेत. तसेच त्यांच्या सहवासांत राहिलेल्या कांहीं गृहस्थांनीं आपली खात्री करून तिचा उल्लेख लेखरूपानें केला आहे याच्या पुढील प्रश्न म्हणजे त्यांना तशी शक्ति असल्यास त्या शक्तीच्या साहाय्यानें त्यांनीं केलेले शोध हे बरोबर आहेत किंवा कसे ? याची सत्यता पाहण्यास उपाय म्हणजे ज्या दुसऱ्या मंडळींनीं याच शक्तीच्या साहाय्यानें शोध करून नमूद केलेले आहेत ते शोध व ज्या गृहस्थांना तशी शक्ति नसतां केवळ ग्रंथांच्या सूक्ष्म अवलोकनानें ज्यांनीं या बाबतींतले आपले निर्णय प्रगट केले आहेत त्यांचीं मतें.

सन १९०८ इ. च्या थिऑसफिस्ट मासिकाच्या मेच्या अंकांत पान ६७४ वर केईटबाई लिहितात कीं,

'The Shri Shankaracharya of the western scholars *was obviously not this Great One but one of his later Successors.*'

मॅडम ब्लॅव्हॅट्स्की आपल्या Secret Doctrine ग्रंथांत सन १८८५-च्या सुमारास लिहितातः-" Shri Shankaracharya, the Greatest Initiate living in the historical ages wrote many a Bhashya ( Commentaries ) on the Upanishads. *But his original treatises* have not yet fallen into the hands of the Philistines for they are too jealously preserved in his monasteries."

याशिवाय बाबू भगवानदास यांनीं 'प्रणववाद' नामक आजपर्यंत अप्रसिद्ध असलेल्या १६००० श्लोकांचे ग्रंथाचे नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या भाषांतराचे प्रस्तावनेच्या २९ पानावर, ज्या पंडित धनराजांच्या तोंडून सदरहु ग्रंथ लिहून घेतला त्यांचें मत सदरहु बाबतींत त्यांचे मित्र परमेश्वरीदास यांचे तोंडून सांगविलें आहे तें असें: 'In 1900 he stayed with me for almost a month in the summer when we did some sporadic work on the *real original* Bhashya on the Bhagvadgita by the *real original* Shankaracharya, *the current one being decided by him to be spurious.*'

ही हकीकत भगवानदास यांनीं मागें पांच सहा वर्षांपूर्वी ( Theosophic Review ) इंग्लंडमध्यें छापिली होती. वरील पंडित धनराज हे थिऑसफिस्ट नाहींत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

वरील लेख केसरीचे २५।८।११ चे सुमारास प्रसिद्ध झाल्यावर डॉ. सर रामकृष्ण भांडारकर यांचे भक्तिमार्गावर व्याख्यान झालें व तेंही केसरींत प्रसिद्ध झालें. त्यांत थिऑसफीचा वाराही नसलेले वरील डॉक्टरसाहेबांनीं केवळ भाषापरिज्ञानदृष्टीने आर्य ग्रंथाचें संशोधन करून यादवकृष्ण व गोपालकृष्ण या दोन व्यक्ति निराळ्या असल्याबद्दल आपलें मत दिलें. नंतर केसरीमध्यें कित्येक दिवस हा वाद माजून अनुकूल प्रतिकूल अशी चर्चा चालली होती.

Theosophy in India या मासिकाचे ऑक्टोबर १९१३ चे अंकांत पान ४८४ वर बंकिपूरचे प्रसिद्ध विद्वान् थिऑसफिस्ट पूर्णेंदु नारायण सिंह, एम. ए., एल एल. बी, यांनीं या विषयावर लिहितांना या मताबद्दल बंगाल्यांतील वैष्णवग्रंथ 'यमलतंत्र' या ग्रंथांतील पुढील श्लोक अवतरणरूपानें दिले आहेत:-

कृष्णोऽन्यो यदुसंभूतो यस्तु गोपेंद्रनंदनः ।
वृंदावनं परित्यज्य स क्वचित् नैव गच्छति ॥

**अर्थः**-यादवांचे कुळांत जन्मलेला कृष्ण दुसरा. जो गोपेंद्र ( नंद ) याचा मुलगा तो वृंदावन सोडून बाहेर कधीं गेला नाहीं.

याच श्लोकाचा दुसरा पाठ असा आहेः—

कृष्णो ऽन्यो यदुसंभूतो यः पूर्णः सोऽस्त्यतः परः ।
वृंदावनं परित्यज्य स क्वचिन्नैव गच्छति ॥

**अर्थः**--यादवकुळांत जन्मलेला कृष्ण जो पूर्णावतार होऊन गेला तो या-( कृष्णा )हून निराळा. हा वृंदावन सोडून बाहेर कधींही गेला नाहीं.

केचित् भागवताः प्राहुरेवमत्र पुरातनाः ।
व्यूहे प्रादुर्भवेदाद्यो गृहेष्वानकदुंदुभेः ॥
गोष्ठे तु मायया सार्धं श्रीलीलापुरुषोत्तमः ।

**अर्थः**--कोणी पुरातन भागवतपंथी असें म्हणतात कीं, वसुदेवाचे घरीं विष्णूचा प्रथम अवतार होईल व यशोदेचे घरीं गोकुळांत लीलापुरुषोत्तम या नांवानें दुसरा अवतार होईल.

ही गोष्ट उघड उघड ग्रंथांतरीं कां सांगितली नाहीं, याविषयीं कृष्णचैतन्य आपला शिष्य रूप यास सांगतात.

एतच्चातिरहस्यत्वान्नोक्तं तत्र कथाक्रमे ।
किंतु क्वचित् प्रसंगेन सूच्यते श्रीशुकादिभिः ॥

**अर्थः**-ही गोष्ट अतिरहस्याची असल्यामुळें तेथें क्रमवार सांगितली नाहीं पण क्वचित् प्रसंगानें शुकादिकांनी ती सूक्ष्मतऱ्हेनें सुचविली आहे.

अशा स्थितींत हीं मतें धर्म व इतिहास यांना विरोधी आहेत, हें म्हणणें निवळ धारिष्टाचें व अविचाराचें आहे.

थिऑसफी अथवा ब्रह्मविद्या म्हणजे पृथ्वीवरील सर्व धर्मपंथांस आधारभूत असलेले सनातन सत्य सिद्धांत होत. आणि म्हणूनच कोणत्याही विशिष्ट धर्मास ते सिद्धांत आपल्या एकट्याच्याच मालकीचे आहेत असें म्हणण्याचा अधिकार पोंचत नाहीं. थिऑसफी जें तत्त्वज्ञान प्रतिपादिते, त्या तत्त्वज्ञानानें या संसारांत दिसणारा घोटाळा व गोंधळ नाहींसा होऊन आयुःक्रमणाच्या मार्गावर लख्ख उजेड पडतो; व न्याय व सदय प्रेम या दोन्ही सद्गुणांनीं उत्क्रांतिमार्ग ओतप्रोत भरलेला आहे, असेंही त्यावरून पूर्णपणें सिद्ध होतें. मरणाबद्दलचें सत्य ज्ञान देऊन, सर्वांस भिवविणारा जो मृत्यु त्याची भीति ही विद्या नष्ट करते व अमर्याद आयुःक्रमांतील वारंवार घडत असणारी मरण ही एक सामान्य गोष्ट आहे, इतकेंच नव्हे तर ऐहिक आयुष्यापेक्षां जास्त प्रकाशमय व महत्त्वाच्या जीवयात्रेचें द्वार खुलें करून देणारी ती एक उपयोगी स्थिति आहे, असें ज्ञान सहजच या विद्येपासून प्राप्त होतें. अमर अशा आत्म्यासंबंधाचें ज्ञान ब्रह्मविद्या या जडलोकावर आणून आणि मनुष्यास, आपण वस्तुतः अविनाशी आत्मा असून, देह व मन हे आपले सेवक आहेत, ही महत्त्वाची गोष्ट ही विद्या सिद्ध करून देते. अखिल धर्मग्रंथ व धर्मप्रेरित सिद्धांत यांतील रहस्यार्थावर उज्ज्वल प्रकाश पाडून, ते ग्रंथ व सिद्धांत तर्क व युक्ति यांच्या कसोटीस उतरवून देण्याचें कठीण परंतु श्रेयस्कर काम ब्रह्मविद्या पार पाडते, व सामान्यतः अंतःस्फूर्तीशिवाय जें कार्य घडणें शक्य नाहीं तें **'रहस्यज्ञान प्रकट करण्याचें'** बिकट काम ब्रह्मविद्याच घडवून आणते.

थिऑसफिकल सोसायटीचे सभासद या सनातन धर्माचें अध्ययन करतात, व थिऑसफिस्ट त्या धर्माप्रमाणें स्वतः आचरण करण्याचा यत्न करितात. अध्ययन करावें, मनौदार्य ठेवावें, उच्चतम ध्येय बाळगावें व सतत नेटानें काम करावें, असें ज्यांस वाटत असेल, अशा प्रत्येक इसमाचें ही सोसायटी मोठ्या प्रेमानें स्वागत करते; पुढें अशा सभासदास खरें थिऑसफिस्ट होतां येणें अथवा न येणें हें केवळ त्याच्या स्वतःच्या प्रयत्नावरच अवलंबून राहणार आहे.

या सोसायटीच्या तेवीस शाखा पृथ्वीवरील सर्व सुधारलेल्या देशांत पसरलेल्या आहेत व सर्व ठिकाणीं हें विश्वबंधुत्वाचें पवित्र कार्य पार पाडण्याचे प्रयत्न यथाशक्ति सुरू आहेत. या सोसायटीचें मुख्य पीठ मद्रासनजीक अड्यार येथें आहे. हिंदुस्थानांतील शाखांचें मुख्य ठिकाण श्रीक्षेत्र काशी येथें आहे. ज्या कोणांस जास्त विस्तृत माहिती पाहिजे असेल त्यांस ती खालील ठिकाणीं मिळूं शकेल:—

अड्यार ( मद्रास एस्. )—रेकॉर्डिंग सेक्रेटरी, थिऑसफिकल सोसायटी.

बनारस सिटी ( युनायटेड प्रॉव्हिन्सेस )—जनरल सेक्रेटरी, थिऑसफिकल सोसायटी, इंडियन सेक्शन्.

याखेरीज महाराष्ट्रांत मुंबई, पुणें, नाशिक, सातारा, सांगली, बेळगांव, धारवाड, हुबळी व तसेंच बडोदें, ग्वाल्हेर, इंदूर, देवास, धार, अकोला, अमरावती, यवतमाळ, नागपूर, जळगांव, मालेगांव वगैरे शहरांतुन थि० सोसायटीच्या शाखा आहेत तेथें चौकशी केली असतांही सर्व माहिती आनंदानें पुरविण्यांत येईल.

# धर्मजागृति मासिक.

हें नवें मासिक गेल्या विजयादशमीपासून पुणें मुक्कामीं सुरू झालें. यांत धार्मिक विषयांवर महाराष्ट्रांतील विद्वानांचे मार्मिक लेख येतात. नवीन युगास अनुरूप अशी सनातन धर्माची मांडणी यांत केली जाते. दरमहा पृष्ठें ४०; वा. वर्गणी ट. हं. सह १।। रुपया. म्यानेजर धर्मजागृति, नं. २ मेनस्ट्रीट, लष्कर पुणें:--शं. ह. मुळे, बुकसेलर बुधवार पेठ, पुणें--शहर.

**मराठी थि. फेडरेशनें प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें.**

१. श्रीसद्गुरूपदिष्ट **साधनचतुष्टय** ( आवृत्ति २ री ). जे. कृष्णमूर्तिलिखित. भाषांतरकार--श्री० सौ० काशीताई कानिटकर. या पुस्तकाचीं जगांतील २४ भाषांत भाषांतरें झालीं आहेत. जगांतच राहून श्रीसद्गुरूपासून शांतिदायक ज्ञानाची जोड कशी करून घ्यावी, तें अगदीं सुलभ रीतीनें यांत सांगितलें आहे. किंमत ८४. कापडी प्रत ( फोटोसह ) किं. ८ आणे.

२. **थिऑसफी आणि थिऑसॉफिकल सोसायटी.** ले.--ना. ग. परांजपे, बी. एस्सी. मूळ केसरी पत्रांतून प्रसिद्ध झालेल्या लेखमालेचें हें पुस्तक आहे. यांत थिऑसफी व थि० सो० संबंधीं संक्षिप्त माहिती, त्यावर निघणाऱ्या सामान्य शंका व त्यांचा खुलासा आहे. किंमत ८२.

३. **ब्रह्मविद्येचा ओनामा.** ( ले०--ना. ग. परांजपे, बी. एस्सी. ) ब्रह्मविद्ये( थिऑसफी )सारखा गहन विषय यांत अगदीं सुलभ रीतीनें, शुद्ध गोड मराठींत, लिहिला आहे. पृष्ठें २६७. सोनेरी कापडी बांधणी. किं. १८४. ट० हं० शिवाय.

४. **थिऑसफी व तिचे टीकाकार.** ( कांहीं आक्षेपांचें निरसन ) ले.-- वा. ल. चिपळूणकर वकील, अकोला. किं. ८१.

हीं पुस्तकें मुंबई--९६ काळबादेवी रोडवर डॉ० त्रिलोकेकरांकडे व शं. ह. मुळे, बुधवार पेठ पुणें, येथें विकत मिळतील.